cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक



घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०० | रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## माळ पहिली



आश्विनशुद्धपक्षीं अंबा बैसलि सिंहासनी हो ।।
प्रतिपदेपासून घटस्थापना ती करूनी हो ।।
मूलमंत्रजप करूनी भोंवते रक्षक ठेउनी हो ।।
ब्रह्माविष्णुरुद्र आईचें पूजन करिती हो ।। १ ।।
उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।
उदाकारें गर्जनी काय महिला वर्णू तिचा हो ।। ध्रु।।

# कुंभमेळ्यासाठीचे ३६ हजार कोटी, शक्तीपीठाच्या ८० हजार कोटींचा निधी शेतकऱ्यांसाठी वापरा!

### पंचनामे, केंद्रीय पथकाचे नाटक कशाला, दसऱ्यापूर्वी हेक्टरी एक लाख रुपये द्या-हर्षवर्धन सपकाळ

जळगाव । प्रतिनिधी

**यंदाचा दुष्काळ अत्यंत गंभीर असून राज्यात ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्याने शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी पिकांचे नुकसान झाले असून उत्पादन घटण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र, सरकारकडून केवळ घोषणा केल्या जात असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. सरकारच्या आर्थिक प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित करत सपकाळ म्हणाले की, कुंभमेळ्यासाठी ३६ हजार कोटी रुपये आणि गरज नसताना हाती घेतलेल्या शक्तिपीठ महामार्गासाठी ८० हजार कोटी रुपये उपलब्ध आहेत; मग संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारकडे पैसे का नाहीत? या दोन्ही प्रकल्पांसाठी प्रस्तावित निधी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरण्याची मागणी त्यांनी केली.**



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जळगाव आणि धुळे जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागाचा पाहणी दौरा करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी, पिकांची स्थिती आणि पाणीटंचाईची परिस्थिती जाणून घेतली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्य सरकारच्या दुष्काळ व्यवस्थापनावर टीका करत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली. राज्यातील बहुतांश भागांत दुष्काळाची तीव्रता वाढली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आणि शेतमजुरांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने दुष्काळ जाहीर केला, पाहणी दौरे केले; मात्र प्रत्यक्ष मदत अद्याप शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. सर्वेक्षण, ▶▶ पान २ वर

#### पंचनामे आणि पाहणी दौरे नकोत, थेट मदत द्या

दुष्काळाची तीव्रता स्पष्ट असताना शेतकऱ्यांना मदतीसाठी विविध प्रक्रियांमध्ये अडकवून ठेवू नये, अशी भूमिका सपकाळ यांनी मांडली. सरकारने दुष्काळ जाहीर केला असला, तरी प्रत्यक्ष मदतीचा अद्याप पत्ता नाही. सर्वेक्षण, पंचनामे आणि केंद्रीय पथकांचे दौरे सुरू आहेत; मात्र या प्रक्रियेत शेतकऱ्यांचा वेळ जात असून आर्थिक संकट अधिक गडद होत आहे, अशी टीका त्यांनी केली.

#### शेतमजुरांना वर्षाला १२ सिलेंडर मोफत द्या

दुष्काळाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांनाही बसत आहे. शेतीतील कामे कमी झाल्याने शेतमजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले असून त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच शेतमजुरांनाही आर्थिक सहाय्य देण्यात यावे. तसेच दुष्काळग्रस्त कुटुंबांना वर्षाला १२ गॅस सिलेंडर मोफत देण्याची मागणीही सपकाळ यांनी केली.

## थोडक्यात...

### पायलट स्मित मच्छारांवरील हल्ल्याची चौकशी होणार

दिल्ली : दुबई ते तेल अवीव प्रवासादरम्यान 'फ्लायदुबई'च्या विमानातील कॉकपिटमध्ये सह-पायलटने स्मित मच्छार यांच्यावर चाकूने वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. विमान हायजॅक करण्याच्या किंवा ते पाडण्याच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. जखमी असूनही, मच्छार यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्यात यश मिळवले; यामुळे इतरांना हल्लेखोराला ताब्यात घेणे शक्य झाले आणि संभाव्य दुर्घटना टळली. त्यानंतर विमान सौदी अरेबियातील तबुककडे वळवण्यात आले. हल्ल्याची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्थेने गुन्हा दाखल केला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ९ ऑक्टोबर रोजी 'विमान अपहरण-विरोधी कायदा, २०१६' आणि 'बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा, १९६७' च्या संबंधित कलमांतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कुंभमेळ्याचा निधी दुष्काळग्रस्तांसाठी वळवा

सोलापूर: महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाड्यासह अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी संकटात सापडला आहे. अशा बिकट परिस्थितीत आगामी नाशिक कुंभमेळ्यासाठी तरतूद करण्यात आलेला सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचा निधी तातडीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वळवावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य सुजात आंबेडकर यांनी सोलापुरातील पत्रकार परिषदेत केली. आंबेडकर यांनी राज्य सरकारच्या धोरणांवर तीव्र टीका केली. ते म्हणाले, मराठवाडा आणि विदर्भात हवा तसा पाऊस झालेला नाही, शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा वेळी सरकारचे प्राधान्यक्रम चुकले आहेत. कुंभमेळ्यासाठी हजारो कोटींचे बजेट मंजूर केले जात आहे. मात्र बळीराजा संकटात असताना त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तुम्ही कितीही मोठा कुंभमेळा केला, साधू-बाबांना बोलावले, मोठा प्रसाद केला किंवा कि तीही मोठे बजेट ठेवले, तरी शेतकरी मरत असताना देव तुम्हाला कधीही पावणार नाही.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०९ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ३५.०० क्विंटल | | |
| २,७०१ | ३,४०० | ३,०४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ११७.०० क्विंटल | | |
| ३,७०१ | ५,९०० | ४,८२२ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | | |
| २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | | |
| १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १०.५० क्विंटल | | |
| ९,३०१ | ९,७२५ | ९,५०५ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | | |
| २,६०० | २,८७२ | २,७७७ |
| मुग: ०.५० क्विंटल | | |
| ९,७०० | ९,७०० | ९,७०० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | | |
| ५,७५१ | ७,००० | ६,६१७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | | |
| ६,७१० | ६,७१० | ६,७१० |

# एसआयआरविरोधात काँग्रेसचे देशव्यापी आंदोलन सर्व आमदार-खासदारांना दिल्लीला बोलावले!

### अभिजीत दिपके, तुषार गांधी यांना ताब्यात घेतल्याने विरोधक आक्रमक; इंडिया आघाडीही मैदानात उतरण्याची शक्यता



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेच्या (एसआयआर) विरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आता देशव्यापी स्वरूप देण्याच्या हालचाली काँग्रेसने सुरू केल्या आहेत. दिल्लीतील ▶▶ पान २ वर

#### ...तोपर्यंत माघार नाही सीजेपी

सीजेपीकडून दिल्लीमध्ये जंतरमंतर २.० चा नारा देण्यात आला होता. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी सीजेपीने एल्गार पुकारला आहे. मात्र आंदोलन कोणत्याही स्थितीत मोडून काढण्यासाठी दिल्ली पोलिसांनी पूर्णपणे बळाचा वापर केला. मुंबईतून दिल्लीकडे येत असतानाच विमानातून उतरण्यापूर्वीच दिल्ली पोलिसांनी महिला पोलिसांचं पथक घुसवून अभिजित दिपके, आशुतोष रांका आणि सौरभ दास यांना ताब्यात घेतले. मात्र तब्बल ८ तासानंतर सुद्धा या तिघांना कुठे नेऊन ठेवण्यात आले आहे, याची माहिती नाही. दरम्यान, अभिजित दिपके यांनी एक संदेश पोस्ट करताना आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदे यांच्याकडे दिली आहे. अभिजित दिपके यांच्या आजीचे निधन होऊनसुद्धा त्यांच्यापर्यंत संपर्क झाला नसल्याचे अजिंक्य शिंदे यांनी म्हटले आहे. पोलिसांनी बळाचा वापर केला असला तरीही कोणत्याही स्थितीमध्ये आम्ही माघार घेणार नाही. पुन्हा आम्ही एकदा जंतरमंतरकडे जाणार आहोत आणि जोपर्यंत ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा होत नाही तोपर्यंत माघार घेणार नसल्याचे शिंदे यांनी म्हटलं आहे.

#### अभिजीत दीपके, रांका, दास यांना विमानातूनच अटक

मुंबईहून दिल्लीला सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके आणि पक्षाचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका हे एअर इंडियाच्या फ्लाइटने पोहोचताच दिल्ली पोलिसांनी थेट विमानातच घुसुन आंदोलनास परवानगी नाकारली असल्याचे सांगत ताब्यात घेतले. बस प्रवासादरम्यान दिपके यांनी त्यांच्यासोबत असलेल्या पत्रकारांना मुलाखती दिल्या. अभिजीत दिपके यांच्या लक्षात येताच त्यांनी या घटनेचे थेट प्रक्षेपण करण्यास सुरुवात केली. अखेर पोलिसांनी तिन्ही नेत्यांना ताब्यात घेतले. आधी रांका, मग दास आणि शेवटी खिडकीजवळ बसलेले दिपके. त्यांना ताब्यात घेताच सीजेपी नेत्यांनी भारत माता की जय च्या घोषणा दिल्या.

#### तरुणांसह आम्हा सर्वांना अटक करा - राहुल गांधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी, तुम्हाला जे करायचे ते करा. संपूर्ण पोलिस दल कामाला लावा. सर्व नेत्यांना अटक करा. सर्व तरुणांना तुरुगात टाका. हवे तर आम्हा सर्वांनाच अटक करा, असे आव्हान देत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदारयाद्यांच्या 'विशेष सखोल पुनरावृत्ती' (एसआयआर) प्रक्रियेतील कथित अनियमिततेमुळे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलक तरुणांना पाठिंबा जाहीर केला.

## असेच सुरू राहिले तर गृहयुद्ध-प्रकाश आंबेडकर



मुंबई । प्रतिनिधी

**वंचित बहूजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. त्यांनी हे सरकार हुकूमशाही पद्धतीचे सरकार आहे. आंदोलन होऊच नये या दृष्टीकोणातून सर्व हालचाली सुरू असल्याचे देखील ते म्हणाले. याचबरोबर त्यांनी विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांना देखील एक सल्ला दिला आहे.**

दिल्लीतील जंतर मंतरवर कॉकरोज जनता पार्टी जंतर मंतर २.० आंदोनल सुरू करत आहे. आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दरम्यान, हे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच दिल्ली पोलीस आणि इतर सुरक्षा दलांनी आंदोलकांना ताब्यात घेण्याचा सपाटा लावला. कॉकरोज जनता पार्टीचा संस्थापक आणि राष्ट्रीय समन्वयक अभिजीत दिपके आणि त्यांच्या आशुतोष, सौरव या साथीदारांना देखील दिल्ली पोलिसांनी विमानातूनच ताब्यात घेतले. प्रकाश आंबेडकर सरकारच्या आंदोलन दडपण्याच्या भूमिकेबद्दल बोलताना म्हणाले, आंदोलनच होऊ नये याच दृष्टिकोनातून ▶▶ पान २ वर

## आदित्य ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर तुषार गांधींची ८ तासांनी सुटका



मुंबई । प्रतिनिधी

राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीने एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन पुकारले होते. तर, मुंबईतही सीजेपीचे कार्यकर्ते आझाद क्रांती मैदानावर आंदोलनासाठी एकत्र आले होते. त्यासाठी, महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी हेही आपल्या घरातून क्रांती मैदानाकडे निघाले असता मुंबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले होते. अखेर, ८ तासांच्या स्थानबद्धतेनंतर आणि शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले आहे. मात्र, पोलिसांनी त्यांची एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या पोलीस ठाण्यात रवानगी केली होती, अशी माहितीही समोर आली आहे.

तुषार गांधींना एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या ठाण्यात नेण्यात आले होते. याबाबत माहिती मिळताच खासदार संजय राऊतांसह आमदार आदित्य ठाकरेंनी पोलीस स्टेशन गाठत पोलिसांना इशारा दिला होता. जोपर्यंत तुषार गांधी यांना सोडून दिले जात नाही, तोपर्यंत पोलीस स्टेशन न सोडण्याचा इशारा आदित्य यांनी दिला होता. त्यानंतर, ▶▶ पान २ वर

## सरकार गुंडगिरीच्या भूमिकेत

### दिल्लीतील आंदोलकांच्या धरपकडीवर जरांगे पाटील संतापले

जालना । प्रतिनिधी



राजधानी दिल्लीत आणि मुंबईतील आझाद क्रांती मैदानात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून होत असलेल्या कारवाई विरोधात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकार सध्या गुंडगिरीच्या भूमिकेत आहे, अशी टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली, ते जालन्यात पत्रकारांशी बोलत होते.

जरांगे पाटील म्हणाले, सरकारला मनमानी करायची आहे. लोकशाही मार्गाचे आंदोलन दादागिरीने मोडून काढायचे आहे, असेही जरांगे पाटलांनी म्हटले. सरकार म्हणेल त्या पद्धतीने आंदोलन चालले पाहिजे, या भूमिकेत सध्या सरकार आहे. सरकारला विद्यार्थ्यांचे आणि गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवायचे नाही. अभिजीत दीपकेंना अटक करणे म्हणजे सरकारला आंदोलन मोडून काढायचे आहे, अशा शब्दात ▶▶ पान २ वर

## विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी माझ्यावर करा

पुणे । प्रतिनिधी



स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून वातावरण तापले आहे. आंदोलनाच्या आठव्या दिवशी पुणे पोलिसांनी १५ आंदोलकांवर विविध कलमांन्वये गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांच्या या कारवाईनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त करत, पुणे सीपी साहेबांचे डोके ठिकाणावर आहे का.? असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. त्यानंतर रोहित पवार थेट फरासखाना ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे आवाहन, आमिर खानच्या पानी फाउंडेशनचे काम लवकरच सुरू

मुंबई । प्रतिनिधी



राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीचा श्वास कोंडणारा 'सुरक्षेचा' वेढा!

देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा छावणीच्या स्वरूपात पाहायला मिळत आहे. १० ऑक्टोबर २०२६ रोजी दिल्लीत ३५ हजारांहून अधिक पोलीस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले. ५७ पैकी ४६ मेट्रो स्थानकांचे दरवाजे बंद, अनेक भागांत मोबाईल इंटरनेटवर बंदी, रस्ते आणि सीमेवर कडक तपासणी, आणि आंदोलकांना अडवण्यासाठी तात्पुरती तुरुंग केंद्रं-ही सर्व दृश्ये एखाद्या युद्धजन्य परिस्थितीची आठवण करून देतात. एका आंदोलनाला सामोरे जाण्यासाठी इतक्या प्रचंड प्रमाणात सुरक्षा व्यवस्था उभारणे, हा केवळ कायदा-सुव्यवस्थ्याचा प्रश्न उरलेला नसून लोकशाहीच्या मूल्यांवर आणि सरकारी मानसिकतेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा प्रकार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'कॉक्रोच जनता पार्टी'ने (सीजेपी) जंतरमंतरवर आंदोलनाची हाक दिली आहे. मतदारयाद्यांमधील कथित अनियमितता आणि मतदारांची नावे वगळल्याच्या गंभीर आरोपांवरून हे आंदोलन उभारले जात आहे. त्याला विविध विद्यार्थी संघटना आणि नागरी समाजाचा पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंतु, पोलिसांनी अवघ्या काही दिवसांपूर्वी (७ ऑक्टोबर) दिलेला अर्ज फेटाळत आंदोलनाला परवानगी नाकारली. '१० दिवस आधी अर्ज केला नाही' हे तांत्रिक कारण पुढे करत प्रशासनाने बंदीचा बडगा उगारला. जुलै महिन्यातील आंदोलनाचा दाखला देत पोलीस सुरक्षेचे समर्थन करत असले, तरी लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा आणि शांततापूर्ण मार्गाने विरोध दर्शवण्याचा घटनात्मक अधिकार आहे. तांत्रिक कारणांचे ढाल करून हा अधिकार हिरावून घेणे कितपत योग्य आहे? केवळ आंदोलकांना रोखण्यासाठी सामान्य दिल्लीकरांना वेठीस धरले जात आहे. कर्तव्यपथ आणि जनपथ परिसरात इंटरनेट बंद ठेवल्याने हजारो नागरिकांचे दैनंदिन व्यवहार ठप्प झाले आहेत. मेट्रो सेवा बंद असल्याने चाकरमान्यांचे अतोनात हाल होत आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे प्रशासनाचे कर्तव्य नक्कीच आहे, पण सुरक्षेच्या नावाखाली सार्वजनिक वाहतूक आणि दळणवळणाची साधने बंद करून सामान्य जनतेला वेठीस घालणे हे प्रशासकीय अपयश दर्शवते. सुरक्षा बलांच्या ११० अतिरिक्त कंपन्या (सुमारे ११ हजार जवान) तातडीने तैनात करण्याचा केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय आणि एकूण ३५ हजारांचा फौजफाटा हा काय सांगतो? सरकारला आंदोलकांची भीती वाटते आहे की जनतेच्या असंतोषाची? जर आंदोलन शांततापूर्ण मार्गाने होणार असेल, तर संवाद साधण्याऐवजी बळाचा वापर करून रस्ते अडवणे आणि शहराला वेढा घालणे हा कुठला न्याय? आंदोलकांचा मुख्य मुद्दा मतदारयाद्यांमधील कथित अनियमिततेचा आहे. लोकशाहीचा पाया हा पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुकांवर आधारलेला असतो. मतदारयाद्यांमधून नावे वगळली जाणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रश्नांची उत्तरे कडक पोलीस बंदोबस्ताने किंवा इंटरनेट सेवा बंद करून देता येत नाहीत. त्यासाठी निवडणूक आयोगाने आणि सरकारने पारदर्शक तपासणी करून स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. नागरिकांच्या मनात उपस्थित झालेल्या शंकांचे निरसन संस्थात्मक जबाबदारीतून झाले पाहिजे, पोलीस लाठीच्या किंवा दडपशाहीच्या जोरावर नाही. प्रश्नांची उत्तरे टाळून आंदोलकांना रस्त्यावर येण्यास भाग पाडायचे आणि नंतर त्यांनाच सुरक्षेचे कारण सांगून अडवायचे, ही नीती लोकशाहीला घातक आहे. पोलीस बंदोबस्ताने दिल्लीचे रस्ते नियंत्रित करता येतील, मेट्रो स्थानके बंद करता येतील आणि गर्दी रोखता येईल; परंतु नागरिकांच्या मनातील असंतोषाचे प्रश्न बंदोबस्ताने संपवता येत नाहीत. लोकशाहीत विरोधाचा आवाज दाबण्यासाठी जेव्हा सुरक्षेचे कवच वापरले जाते, तेव्हा सरकार आणि जनता यांमधील विश्वासाचा धागा तुटतो. दिल्लीला छावणीचे स्वरूप देऊन कायदा-सुव्यवस्था राखल्याचा दावा सरकार करू शकते, पण विरोध सहन करण्याची आणि प्रश्नांना पारदर्शकपणे सामोरे जाण्याची ताकद गमावणे हा लोकशाहीचा पराभव आहे. प्रशासनाने दडपशाहीचा मार्ग सोडून संवादाची आणि उत्तरदायित्वाची वाट धरली पाहिजे.

# हातोडाफेक स्पर्धेत आदर्श अशोक कानडे जिल्ह्यात प्रथम!

## जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्तुंग झेप; क्रीडा क्षेत्रात यशाचा नवा अध्याय

**म्हाळस जवळा । प्रतिनिधी**

**जिल्हास्तरीय हातोडाफेक स्पर्धेत जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थी आदर्श अशोक कानडे याने प्रथम क्रमांक पटकावत दैदीप्यमान यश संपादन केले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**




क्रीडा क्षेत्रात जिद्द, मेहनत, सातत्य आणि सरावाच्या जोरावर यश संपादन करता येते, हे आदर्श कानडे याने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. जिल्हास्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणे ही त्याच्यासाठी अभिमानाची बाब असून, त्याच्या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देणाऱ्या जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासाठी हे यश विशेष अभिमानास्पद ठरले आहे. आदर्शच्या या विजयाने विद्यालयाने क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आदर्शला या स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षक शाहू सातपुते, प्रा.गौतम घुमरे यांनी विशेष मार्गदर्शन केले. या यशाबद्दल आदर्श अशोक कानडे याचे संस्था अध्यक्ष माजी आमदार राजेंद्रजी जगताप साहेब, सचिव युवराज भैय्या जगताप , संस्था प्रतिनिधी शंकरराव (तात्या) जगताप, केंद्रप्रमुख उनवणे सर यांच्यासह विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य रोहिदास डोंगरदिवे ,पर्यवेक्षक रमेश डोळे, आदर्श पालक रज्जाकपूर चे अशोकराव कानडे, जवळ्याचे माजी सरपंच शहादेव अबा खांडे, सचिन अप्पा पाटोळे, सर्व उच्च माध्य. शिक्षक,शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. जिल्ह्यात प्रथम येण्याची कामगिरी करणाऱ्या आदर्शच्या यशामुळे जवळा माध्य. व उच्च विद्यालयाची मान उंचावली असून, त्याच्या या उत्तुंग भरारीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# इंदुवासिनीदेवी, गणेशानंद गडावर नवरात्र महोत्सव व हरिनाम सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**

**शिरूर (कासार) तालुक्यातील श्रीक्षेत्र इंदुवासिनी संस्थान गणेशानंदगड, पिंपळनेर येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रविवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ पासून शारदीय नवरात्र महोत्सव, अखंड हरिनाम सप्ताह व गीता उपनिषिध सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

या शारदीय नवरात्र महोत्सवात पहाटे ४.०० ते ६.०० काकडा भजन, ६.०० ते ७.०० देवतांची पूजा, अभिषेक, स्तुति प्रार्थना, ८.०० ते १०.०० सप्तसती पाठ, १०.०० ते १२.०० गाथाभजन, ४.०० ते ५.३० गीता उपनिषिध सत्संग, ५.३० ६.३० ते हरिपाठ, ६.३० ते ८.३० कीर्तन व कीर्तनंतर भोजन व त्यानंतर जागर होणार आहे. सप्ताहात दिनांक ११ ऑक्टोबर रोजी ह भ प अनिरुद्ध महाराज शिंदे छत्रपती संभाजीनगर यांचे सायंकाळी ६.३० वाजता कीर्तन, दि. १२ ऑक्टोबर रोजी ह.भ प. अशोक महाराज कोंगे, शिरसाटवाडी, दि. १३ रोजी ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री श्रीक्षेत्र भगवानगड, वासुंडी मेहगाव, दि.१४ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. मुरलीधर महाराज बारगजे, परीक्षक, वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र आळंदी, दि.१५ ऑक्टोबर रोजी रामनाथ महाराज शास्त्री श्रीक्षेत्र पावन गणपती, थाटे वडगाव, दि.१६ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. डॉ. विक्रम महाराज सारुक शिक्षणाधिकारी, दि.१७ ऑक्टोबर रोजी मठाधिपती ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे, मठाधिपती, बंकटस्वामी संस्थान, संस्थान, दि.१८ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री, मठाधिपती गहिनीनाथ गड, दि.१९ ऑक्टोबर रोजी महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, मठाधिपती, इंदुवासिनी संस्थान, गणेशानंदगड यांचे किर्तन होणार आहे. दि.२० ऑक्टेंबर रोजी सकाळी ७.३० ते ८.३० कावडीच्या पाण्याने अभिषेक व त्यानंतर ९.०० ते ११.०० होमहवन आणि दुपारी २.०० ते ५.०० गुरुमंत्र होणार आहे.

# औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी १२ उमेदवारांनी माघार घेतली. यापूर्वी ८ ऑक्टोबर रोजी एका उमेदवाराने माघार घेतली होती. त्यामुळे एकूण १३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली असून, आता ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी नमुना ७-अ व ७-ब मध्ये ९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेनंतर प्रसिद्ध करण्यात आली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिली.**

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात ५-औरंगाबाद पदवीधर निवडणूकी संदर्भात माहिती देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी सह आयुक्त मंजुषा मिसकर, अपर आयुक्त प्रताप काळे, अपर आयुक्त कुशालसिंह परदेशी, उपयुक्त नगरपालिका प्रशासन देविदास टेकाळे तसेच तहसीलदार के.के. भदाणे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या निवडणुकीची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार सुरू झाली असून नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठी २९ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. या कालावधीत ६२ उमेदवारांनी एकूण ९२ नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. ७ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ९२ नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्त माधवी खाडे-चावरे उपस्थित होत्या. या छाननीमध्ये आठ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरवून नाकारण्यात आले. छाननीनंतर ५४ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र वैध घोषित करण्यात आले होते. यानंतर ८ ऑक्टोबर रोजी अंकुश रामराव शिंदे यांनी, तर ९ ऑक्टोबर रोजी ॲड. गुल्लापेल्ली योगेश दत्तु, दीपिका बाप्पा उदरभरे, प्रतीक्षा प्रशांत चव्हाण, प्रशांत रमेश पाटील अवसरमल, प्रियंका केशव तांदळे, बाबासाहेब भुजंगराव उगले, मधुकर किसनराव देशमुख, श्यामकुमार सुरेशराव बोडखे, शेख मोहम्मद अख्तर मोहम्मद सादेक, शेख सलीम शेख इब्राहीम, सुदामराव सदाशिवे आणि संदीप देविदास जाधव यांनी उमेदवारी मागे घेतली. असे एकूण १३ उमेदवारांनी या निवडणुकीतून माघार घेतली आहे. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील एमआयडीसी, चिकलठाणा येथील वुडस्ट्रीम डेकर एलएलपी येथे होणार आहे. मतमोजणीसाठी ४४५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# श्री रेणुका मातेच्या नवरात्र महोत्सवाच्या तयारीचा नगरपंचायतीकडून आढावा

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा शहराचे ग्रामदैवत श्री रेणुका माता देवीच्या नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीकडून मंदिर परिसरातील विविध कामांचा आढावा घेण्यात आला. नवरात्र महोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी नगरपंचायतीच्या वतीने आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे यांनी दिली.**



नवरात्र महोत्सवाच्या अनुषंगाने नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, मुख्याधिकारी अमित मांडवकर यांच्यासह नगरसेवकांनी श्री रेणुका माता मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परिसरातील स्वच्छता, रस्त्यांवरील पथदिवे, भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच फिरत्या स्वच्छतागृहांची उपलब्धता यासह विविध कामांचा आढावा घेण्यात आला. नवरात्र महोत्सवाच्या काळात मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने नगरपंचायतीकडून नियोजन करण्यात येत आहे. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्था सुरळीत ठेवणे आणि पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करणे याबाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी नगराध्यक्ष व उपस्थित पदाधिकाऱ्यांनी धरणेकरी आणि मंदिर संस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून नवरात्र महोत्सव व यात्रेच्या नियोजनाबाबत चर्चा केली. महोत्सव शांततेत, सुव्यवस्थित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नगरपंचायत आणि मंदिर संस्थान यांच्यात समन्वय ठेवण्यावर भर देण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, मुख्याधिकारी अमित मांडवकर, नगरसेवक राजेश खंदारे, बाजखान पठाण, शरद मोरे, सतीश बोराडे, संजय कुलकर्णी, सुनील कुलकर्णी, सुधीर देवा जोशी, नागेश कुलकर्णी, भगवान कुलकर्णी, रामेश्वर बोराडे, राजेभाऊ बोराडे, नगरपंचायतीचे कर्मचारी, धरणेकरी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून...

### कुंभमेळ्यासाठीचे ३६ हजार कोटी, शक्तीपीठाच्या

पंचनामे आणि केंद्रीय पथकांच्या पाहणी दौऱ्यांची प्रक्रिया थांबवून सरकारने दसऱ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हेक्टरी एक लाख रुपये थेट जमा करावेत, सरसकट कर्जमाफी करावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. एका बाजूला हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांसाठी निधीची तरतूद केली जाते, तर दुसऱ्या बाजूला दुष्काळामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. सरकारने विकासकामांबरोबरच शेती आणि शेतकऱ्यांच्या जगण्यालाही प्राधान्य दिले पाहिजे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारने कोणत्याही विलंबाशिवाय दसऱ्यापूर्वी हेक्टरी एक लाख रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. त्याचबरोबर शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून त्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करावे. दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबांवर आर्थिक ताण वाढला असून मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवणेही कठीण झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णयही सरकारने घ्यावा, अशी मागणी सपकाळ यांनी केली. दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत आहे. पशुधन वाचवण्यासाठी सरकारने तातडीने जनावरांच्या छावण्या सुरू कराव्यात. चारा आणि पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसताना जनावरांचा सांभाळ करणेही कठीण झाले आहे. त्यामुळे दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना केवळ कागदावर न ठेवता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

----------

### असेच सुरू राहिले तर

प्रयत्न चाललेला आहे. सरकारने ट्रेन बंद केल्या असल्या तरी लोक पाच-पाच, सहा-सहा किलोमीटर चालत आंदोलनासाठी येत आहेत. लोकांपुढे त्यांचे कर्तृत्व येऊ नये आणि त्याची चर्चा होऊ नये, अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. असे देखील प्रकाश अंबेडकर म्हणाले. त्यांनी पोलिसांनी यंगर जनरेशनला (तरुण पिढीला) चॅलेंज देण्याच्या भानगडीत पडू नये. पोलिसांनी नोटीसा दिल्या असल्या तरी हजारो लोक हुतात्मा स्मारकात जमून पाठिंबा जाहीर करतील. जमावबंदीचा कायदा आणीबाणीमध्ये (इमर्जन्सी) वापरला पाहिजे, परंतु पोलीस तो रोजच्यासारखा आयत्या वेळी वापरत आहेत असे वक्तव्य देखील त्यांनी केले. हे जे सरकार आहे हे हिटलरशाहीचे सरकार आहे. आम्ही चुकतो किंवा कोणाशी चर्चा केली पाहिजे अशी यांची वृत्ती नाही. सरकारने जो चुकला आहे त्याला चुकले हे म्हणायला शिकले पाहिजे, तरच इथली लोकशाही टिकेल; नाहीतर असा हुकूमशाहीचा मार्ग राहिला तर इथे सिव्हिल वॉर (गृहयुद्ध) होताना मला दिसत आहे. असे म्हणत एकप्रकारे सरकारला परिस्थितीची जाणीवच करून दिली. प्रकाश आंबेडकर यांनी अभिजीत यांच्या आंदोलनाबाबत बोलताना एक सल्ला देखील दिला. त्यांनी, आता हटता कामा नये. लढा हातात घेतला तर पूर्णपणे केला पाहिजे, असे म्हटले. लोकांचा सरकारच्या विरोधात प्रक्षोभ आहेच. सध्या मुख्य मुद्दा मुख्य निवडणूक आयुक्तांचा आहे, परंतु सरकार त्यावर बोलायलाच तयार नाही. असे देखील ते म्हणाले. दरम्यान, अमिताभ बच्चन यांच्या विधानाचा संदर्भ देत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, जसे अमिताभ बच्चन म्हणाले होते की 'वन मॅन शो' संपलेला आहे आणि एक नट पूर्ण सिनेमा कॅरी करू शकत नाही; राजकारणातही तीच परिस्थिती आली आहे. राहुल गांधींनी काँग्रेस पक्ष हाच एक पक्ष आहे हे जे त्यांच्या डोक्यात बसलेले आहे ते काढून टाकावे. काँग्रेसला इतर जण मदत करायला तयार आहेत, तेव्हा त्यांनी ती मदत स्वीकारली पाहिजे.

-------------

### एसआयआरविरोधात काँग्रेसचे

जंतरमंतरवर आंदोलनाची घोषणा करणारे कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना विमानतळावरच ताब्यात घेण्यात आले, तर मुंबईत आंदोलनासाठी जात असताना महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. या घटनांनंतर विरोधी पक्ष आक्रमक झाले असून, काँग्रेसने देशातील सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ नेत्यांना दिल्लीमध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे एसआयआरच्या मुद्द्यावर केंद्र सरकारविरोधात मोठे आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे. काँग्रेस पक्षनेतृत्वाने देशभरातील सर्व आमदार आणि खासदारांना रविवार संध्याकाळपर्यंत दिल्लीत पोहोचण्यास सांगितले आहे. विशेष म्हणजे, सर्व राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांनाही दिल्लीमध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे या आंदोलनासाठी काँग्रेस संघटनात्मक पातळीवर तयारी करत असल्याचे चित्र आहे. देशभरातील नेत्यांना एकत्र आणून एसआयआर आणि निवडणूक आयोगाच्या कारभाराचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर उपस्थित करण्याची पक्षाची रणनीती असल्याचे मानले जात आहे. कॉकरोच जनता पार्टीने एसआयआर रद्द करण्यासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन पुकारले होते. या आंदोलनासाठी पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके आपल्या सहकाऱ्यांसह विमानाने दिल्लीला पोहोचले. मात्र, विमानतळावरच महिला पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आंदोलनाची जबाबदारी अजिंक्य शिंदे यांच्याकडे आली. या घडामोडींनंतर पोलिसांनी काही विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही ताब्यात घेतले. यामुळे एसआयआरविरोधातील आंदोलनाला राजकीय पाठबळ मिळण्याची शक्यता वाढली आहे. एसआयआर प्रक्रियेवरून सुरू असलेला संघर्ष आता काँग्रेसच्या पुढाकाराने व्यापक राजकीय आंदोलनात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. काँग्रेससह इंडिया आघाडीतील इतर पक्षही या मुद्द्यावर एकत्र आले, तर केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनाला व्यापक स्वरूप मिळू शकते. त्यामुळे काँग्रेसच्या पुढील भूमिकेकडे आणि दिल्लीतील संभाव्य आंदोलनाच्या कार्यक्रमाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

------------

### विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल

पोलिस ठाण्यात पोहोचले. एस.एम. जोशी पूल परिसरात २ ऑक्टोबरपासून विद्यार्थ्यांचे शांततापूर्ण आंदोलन सुरू आहे. आंदोलक तरुणांवर गुन्हे दाखल झाल्यानंतर रोहित पवार यांनी फरासखाना पोलिस ठाण्यात धाव घेत पोलिसांना जाब विचारला. गोरगरीब विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांची मुले ही महाराष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांना आतंकवादी, दहशतवादी किंवा गुप्तहेर ठरवणाऱ्या पोलिसांचा जाहीर निषेध आहे, असा घणाघात त्यांनी केला. एका लोकप्रतिनिधीच्या नात्याने मीही या आंदोलनात सहभागी झालो होतो, त्यामुळे विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी माझ्यावर गुन्हे दाखल करा आणि विद्यार्थ्यांवरील गुन्हे तातडीने मागे घ्या, असा इशारा त्यांनी सरकारला दिला. चिथावणीखोर वक्तव्ये करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी १५ जणांवर एफआयआर नोंदवला आहे. मात्र, सरकारने पोलिसी बळाचा गैरवापर करून आंदोलन चिरडण्याचा कट रचल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये अनेक गंभीर त्रुटी असून, आंदोलनस्थळी नसलेल्यांची नावे टाकण्यासह महिला आंदोलकांना पुरुष आणि पुरुषांना महिला दाखवल्याचा आरोपही विद्यार्थ्यांनी केला.

-----------

### सरकार गुंडगिरीच्या

जरांगे पाटलांनी सरकारच्या भूमिकेवर हल्लाबोल केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानावरही आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. मात्र, तत्पूर्वीच मुंबईतील अनेक भागात कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्याचे काम मुंबई पोलिसांकडून करण्यात आले. यावरून जरांगे पाटील संतापले आहेत. त्यांनी हे सरकारी गुंडागर्दी असल्याचे म्हटले आहे.

------------

### महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्व

यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

**जलसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढवणे आवश्यक- अभिनेते आमिर खान**

आगामी उन्हाळ्यापासून जलसंधारणाची कामे सातत्याने राबविण्याचे गरजेचे आहे. जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येईल. यंदाचे वर्ष आव्हानात्मक असले, तरी निराशेचे रूपांतर आशेत करून जनतेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे संवर्धन यावर भर देतानाच, राज्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घराने जलसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असेही अभिनेते आमिर खान यांनी यावेळी सांगितले.

---------------

### आदित्य ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर

अखेर ८ तासांनी तुषार गांधींची सुटका करण्यात आली. तुषार गांधी ८ तासांहून अधिक वेळ मुंबई पोलिसांच्या ताब्यात होते, आदित्य ठाकरे येणार कळताच मुंबई पोलिसांनी तुषार गांधी यांना दुसऱ्या पोलीस स्थानकात फिरवले. गांधी यांना वांद्रे येथून ताब्यात घेतल्यानंतर आधी डी.एन.नगर पोलीस स्थानकात ठेवण्यात आले होते. मात्र, संध्याकाळी आदित्य ठाकरे त्यांना सोडविण्यासाठी पोलीस स्थानकात येणार कळताच, वैद्यकीय तपासणीचे कारण देत पोलिसांनी तुषार गांधी यांना मागच्या बाजूने काढून बोरिवली पोलीस स्थानकात नेण्यात आले. संध्याकाळी साडे चार ते पाच वाजताच्या सुमारास त्यांना डी.एन. नगरकडून बोरिवली पोलीस स्टेशनला नेण्यात आले होते. अखेर, स्वत: बोरिवली पोलीस तुषार गांधी यांना घेऊन, त्यांच्या घरी गेले. तब्बल ८ तास डिटेन केल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. दरम्यान, दुसरीकडे मुंबईतील डी.एन. नगर पोलिसांनी महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांना ताब्यात घेतल्याने ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली होती. जोपर्यंत तुषार गांधी यांना सोडण्यात येणार नाही, तोपर्यंत आम्ही पोलीस स्थानकातून बाहेर जाणार नाही, असा पवित्रा आमदार आदित्य ठाकरे यांनी घेतला होता. मुंबईतील सगळे शिवसैनिक हे या पोलीस स्थानकाबाहेर जमतील, आदित्य ठाकरेंनी पोलिसांसोबतच्या चर्चेत भूमिका मांडल्याने पोलिसांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या आणि गांधींची सुटका केली.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ११ ऑक्टोबर २०२६


## थोडक्यात

### भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये साबलखेड चा ऋतिक चांगदेव देसाई पुणे विभागामध्ये तिसऱ्या क्रमांकामध्ये यशस्वी

कडा । प्रतिनिधी

युवक महोत्सव जळोष ऑल महाराष्ट्र मधून सहा विभाग निवडले गेले होते यामध्ये भारतीय शास्त्रीय गायन यामध्ये पुणे विभागांमध्ये आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील ऋतिक चांगदेव देसाई हा तिसऱ्या क्रमांकामध्ये आला असल्याने साबलखेड ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





### जल जीवन मिशन अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळाले जैविक व रासायनिक पाणी तपासणीचे प्रत्यक्ष धडे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात यावर्षी पावसाचे अत्यल्प प्रमाण असल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असतानाच, उपलब्ध पाची गुणवत्ता टिकवून ठेवणे आणि नागरिकांना शुद्ध पाणी मिळणे अत्यंत गरजेचे बनले आहे. या पार्श्वभूमीवर, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि शुद्धतेचे महत्त्व समजून घेण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी व अभ्यास केला. राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि 'जल जीवन मिशन' अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. ग्रामस्थांना स्वच्छ, शुद्ध आणि पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासोबतच पाण्याच्या गुणवत्तेबाबत समाजात जनजागृती करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

प्रत्यक्ष प्रयोगांमधून जाणून घेतली तपासणी प्रक्रिया

अभ्यास सहलीदरम्यान प्रयोगशाळेतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना पाण्याच्या रासायनिक आणि जैविक तपासणीच्या विविध पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. * पाण्याचे नमुने संकलित करण्याची शास्त्रोक्त पद्धत.

पिण्याच्या पाण्यासाठी ठरवून दिलेली मानके (थरीशी टीएसडीं डीएपवरीवी). * पाण्यात असणारे विविध रासायनिक घटक आणि त्यांचे शरीरावर होणारे अपायकारक परिणाम. * पाणी दूषित होण्याची कारणे, दूषित पाण्यामुळे होणारे आजार आणि पाणी शुद्ध ठेवण्यासाठी घ्यावयाची काळजी. रसायनशास्त्रातील सिद्धांतांची प्रत्यक्ष प्रयोगशाळेत अनुभूती मिळाल्याने विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजजागृतीचा प्रयत्न**

बीड जिल्ह्यात पाणी तपासणीसाठी पाच उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. या प्रयोगशाळांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये पाणी गुणवत्तेविषयी जनजागृती केली जात आहे. शाळेत शिकलेले विज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात कसे उपयोगी पडते, हे पाहताना विद्यार्थ्यांनी अनेक शंकांचे निरसन करून घेतले. या अभ्यास सहलीच्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता, वरिष्ठ भूवैज्ञानिक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, जिल्हास्तरावरील तज्ञ, गट व समूह समन्वयक संबंधित शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्हा परिषदेच्या सर्वच विभागाकडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी उपाय योजना केल्या जात आहे.**

पिण्याच्या पाण्याचा संबंध थेट ग्रामस्थांच्या आरोग्याशी असल्याने टँकर असो की इतर कुठलाही स्रोत असो त्याचे जैविक व रासायनिक तपासणी होण्याकरिता ग्रामस्थांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. सर्व शालेय विद्यार्थी पाणी व स्वच्छता बालवीर म्हणून यापुढे जनजागृतीची भूमिका पार पाडणार आहे. जलसुरक्षकांमार्फत पाणी निर्जंतुकीकरणाचे सहनियंत्रण करणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिथे रहमान यांनी दिली आहे.

# नवगण राजुरी येथे ६० किलो गांजा जप्त ; ३० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध धंदे आणि अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम राबवत नवगण राजुरी येथे मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ६० किलो ७० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, आरोपीला मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची बाजारातील किंमत सुमारे ३० लाख ३ हजार ५०० रुपये आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, मौजे नवगण राजुरी येथील गौसखान उर्फ बाबू उमरखान पठाण (वय ६० वर्षे) याने आपल्या राहत्या घरात विक्रीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर गांजा साठवून ठेवला होता. या माहितीच्या आधारे पोलिसांनी ९ ऑक्टोबर रोजी रात्री १०.१५ वाजेच्या सुमारास संशयिताच्या घरावर छापा टाकला.

झडतीदरम्यान घरामध्ये चार वेगवेगळ्या गोण्यांमध्ये साठवून ठेवलेला ६० किलो ७० ग्रॅम ओलसर-सुकट गांजा मिळून आला. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत सदर मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी गौसखान पठाण याच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात एनडीपीएस (छछझड) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, बीड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री किंवा साठवणूक करणाऱ्यांची माहिती नागरिकांनी निर्भयपणे 'अंमली पदार्थ विरोधी कक्षा'च्या ९२७०२४३२०० या क्रमांकावर द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन बीड पोलीस प्रशासनाने केले आहे.



# दुष्काळातही शेतीत झेंडूचा बहर आणी डोळ्यांत सरकारी अधिकारी होण्याचं स्वप्न!

ज्योतीराम पांढरपोटे / माजलगाव:- तालुक्यातील नित्रुड येथील बाबासाहेब तुकाराम गायकवाड यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेती आणि शिक्षणाची सांगड घातली आहे. वडिलांचे छत्र हरपल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर पडली, मात्र परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी शेतीतून आर्थिक बळ उभे केले आणि त्याचवेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली आहे. त्यांची जिद्द आणि मेहनत ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथील तरुण बाबासाहेब गायकवाड यांच्याकडे साडेपाच एकर शेती आहे.मात्र, पारंपरिक शेतीसोबतच उत्पन्नाचे नवे साधन निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी केवळ दीड एकर क्षेत्रात झेंडूच्या फुलांची लागवड सुरू केली.गेल्या सात वर्षांपासून ते झेंडूची शेती करत आहेत.योग्य नियोजन, सातत्यपूर्ण मेहनत आणि बाजारपेठेचा अभ्यास या त्रिसूत्रीच्या जोरावर त्यांनी या शेतीतून चांगले आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा मार्ग शोधला आहे. झेंडूच्या शेतीतून त्यांना वर्षाला सुमारे ७ ते ८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले जाते.शेती म्हणजे केवळ उदरनिर्वाहाचे साधन आणि शिक्षण म्हणजे वेगळी वाट,अशी विभागणी न करता बाबासाहेब यांनी दोन्ही क्षेत्रांचा समतोल साधला आहे. दिवसभरातील वेळेचे नियोजन करून ते शेतीची कामे सांभाळतात, तसेच उर्वरित वेळेत महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि इतर स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतात.झेंडूच्या शेतीतून मिळणारा आर्थिक आधार त्यांच्या शैक्षणिक प्रवासालाही मदत करत आहे.



**नित्रुडच्या बाबासाहेब गायकवाड यांचा शेती आणि शिक्षणाचा अनोखा मेळ, वर्षाला ७ ते ८ लाखांच्या उत्पन्नाची प्रेरणादायी वाटचाल**

जिद्द,नियोजन आणि मेहनतीचा आदर्श

वडिलांचे छत्र हरपल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून स्वतःच्या मेहनतीवर उभे राहणे,शेतीतून उत्पन्नाचे साधन निर्माण करणे आणि त्याचवेळी सरकारी नोकरीचे स्वप्न उराशी बाळगणे,ही बाबासाहेब गायकवाड यांच्या प्रवासाची खासियत आहे.प्रतिकूल परिस्थितीला दोष देत न बसता उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून प्रगती साधता येते, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

योग्य नियोजन,कष्ट, ध्येयाप्रती चिकाटी

ग्रामीण भागातील अनेक तरुण शेती आणि शिक्षण यांपैकी एकाची निवड करण्याच्या संभ्रमात असतात. मात्र,योग्य नियोजन,कष्ट करण्याची तयारी आणि ध्येयाप्रती असलेली चिकाटी यांच्या जोरावर दोन्ही गोष्टी सांभाळता येऊ शकतात,असा सकारात्मक संदेश बाबासाहेब यांच्या वाटचालीतून मिळतो.

ग्रामीण तरुणांसाठी निश्चितच आशेचा किरण

शेतीत फुलवलेला झेंडूचा मळा आणि मनात जपलेले सरकारी अधिकारी होण्याचे स्वप्न,या दोन्हींच्या बळावर बाबासाहेब गायकवाड यांची वाटचाल सुरू आहे.त्यांची ही संघर्षमय आणि प्रेरणादायी कहाणी ग्रामीण तरुणांसाठी निश्चितच आशेचा किरण ठरत आहे.

## पान ६ वरुन...

### १ क्विंटल ८६ किलो गांजा

या कारवाईत गांजासदृश वनस्पतींची एकूण ११६ झाडे आढळून आली.त्यापैकी ११५ झाडे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या वनस्पतींचे एकूण वजन १८६.५७ किलो असल्याचे एफआयआरमध्ये करण्यात आले आहे.या प्रकरणी एनडीपीएस कायदा,१९८५ मधील कलम ८(क), २०(अ) व २०(ब)(२)(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर प्रकरणात आरोपीचे वतीने न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माजलगाव येथील मा. जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला.त्यामुळे आरोपीला न्यायालयीन प्रक्रियेत दिलासा मिळाला आहे.आरोपीच्या वतीने ड.एस.के.गोंडे यांनी काम पाहिले व त्यांना ड.एन.एस.तेलगड यांनी सहकार्य केले.

### ऊसाला पहिली उचल

प्रतिटन ५०० रुपये अनुदान तातडीने द्यावे, अशीही मागणी करण्यात येत आहे.या मागण्यांसंदर्भात अंबासाखर, येडेश्वरी, रांजणी आणि गंगामाऊली साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक मांजरा विश्रामगृहासमोर, धनेगाव कॅम्प येथे होणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि यंदाच्या गळीत हंगामातील दर निश्चितीबाबत एकजूट मजबूत करण्यासाठी या बैठकीला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. राहुल खोडसे यांनी केले आहे.

### आ. सुरेश धस व त्यांच्या

मीडियावरील कथित बदनामीकारक आरोपांना वेळीच आळा घालून सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई न झाल्यास समस्त आंबेडकरी संघटनांच्या वतीने आष्टी येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करून रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर नगरसेवक अरुण निकाळजे, दीपक निकाळजे, शशिकांत निकाळजे, परिवहन गायकवाड, राजू निकाळजे, जालिंदर निकाळजे, सादिक कुरेशी यांच्यासह आंबेडकरी समाजातील अनेक कार्यकर्ते व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### नेकनूर पोलीस कोठडीत

पांघरुणाच्या कापडाचा वापर करून गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, लॉकअप सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस अंमलदारांच्या ही बाब तत्काळ निदर्शनास आल्याने त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तत्परतेने हस्तक्षेप करून आरोपीचा जीव वाचविला. त्यानंतर आरोपीस तातडीने शासकीय रुग्णालय, नेकनूर व प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, बीड येथे हलविण्यात आले. वैद्र्यकीय तपासणीअंती आरोपीची प्रकृती स्थिर असल्याचे निष्पन्न झाले. उपचारानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज मिळताच आरोपीस मा. न्यायालयात हजर करून १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मागण्यात आली. मा. न्यायालयाने आरोपीस १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर केल्याने त्याची बीड जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. तसेच पोलीस कोठडीत असताना कायदेशीर कारवाई टाळण्याच्या उद्देशाने आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७२८/२०२६, इछड कलम २२६ अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

### तीन एकरांत ५४ हजारांचा

चाऱ्याची टंचाई: पिके जळाल्याने चाऱ्याची मोठी कमतरता निर्माण झाली आहे. त्यातच हार्वेस्टरने काढणी केल्यामुळे भुसकटही गोळा करता येत नाही, ज्यामुळे चाऱ्याची अडचण दुप्पट झाली आहे. फळबागा सुकण्याच्या मार्गावर: परिसरातील डाळिंब व मोसंबीच्या फळबागा पाण्याअभावी वाळून जात आहेत. वेळेत मदत न मिळाल्यास फळबागा कायमच्या उद्ध्वस्त होण्याचा धोका आहे.

केंद्रीय पथकाकडे शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

शेततळ्यांसाठी तातडीने ५० हजार रुपये अनुदान मिळावे.

फळबागांच्या नुकसानीपोटी हेक्टरी २ लाख रुपयांची भरीव मदत जाहीर करावी.

### आंतर-महाविद्यालयीन बास्केट

कुलगुरू डॉ. इंद्र मनी सर यांनी सदरील स्पर्धेचे आयोजनाची संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे खेळा प्रतीचे प्रेम पाहून आभार व्यक्त केले. सदरील स्पर्धेसाठी आलेल्या संघ व्यवस्थापक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने केलेला नाष्टा जेवण व इतर व्यवस्थेबद्दल कौतुक केले. स्पर्धेत मुलांचे ८ संघ आणि मुलींचे ६ संघ, अशा एकूण १४ संघांनी सहभाग नोंदविला. विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक कौशल्य, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडविले. मैदानावर झालेल्या चुरशीच्या लढतींमुळे स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य कृषी, जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्र व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य, प्राध्यापक, क्रीडा विभाग, कर्मचारी यांनी उत्कृष्टरित्या केले.

**मुलींच्या सघात बीड विजेता परभणी ठरला उपविजेता**

आदित्य कृषी महाविद्यालय, बीड विजेते तर कृषी महाविद्यालय, परभणी उपविजेते ठरला. मुलांचा संघामध्ये कृषी महाविद्यालय, परभणी विजेते तर उपविजेते अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी ठरला.

**खेळाडूंनी अभ्यासासोबत नेतृत्वगुण जोपासावेत : डॉ. राजेश कदम**

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम म्हणाले की, अमृतकाळातील विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता सांघिक खेळांच्या माध्यमातून नेतृत्वगुण, शिस्त, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता आत्मसात केली पाहिजे. खेळामुळे संघभावना निर्माण होऊन जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ मिळते.

# पोलीस कोठडीत आत्महत्येचा प्रयत्न, पोलिसांच्या सतर्कतेने टळला अनर्थ

बीड । प्रतिनिधी

नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यात मागील दीड वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या एका अट्टल गुन्हेगारास जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीने पोलीस कोठडीत गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला; मात्र कर्तव्यावर तैनात असलेल्या पोलीस अंमलदारांच्या सतर्कतेमुळे त्याचा जीव वाचला. न्यायालयाने आरोपीची १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडीत (जिल्हा कारागृह) रवानगी केली आहे.

धाराशिव जिल्ह्यातून शिताफीने अटक

नेकनूर पोलीस ठाण्यात दाखल गु.र.नं. ११७/२०२५, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१०(२) अन्वये दरोड्याच्या गुन्ह्यात बालाजी ऊर्फ आबड्या अजिनाथ शिंदे (वय २२ वर्षे, रा. मांडवा, ता. वाशी, जि. धाराशिव) हा गेल्या दीड वर्षापासून फरार होता.



अटक टाळण्यासाठी स्वतःला इजा करून घेण्याची प्रवृत्ती असल्याने या अट्टल आरोपीला पकडणे पोलिसांसमोर एक आव्हान होते. अखेर बीड पोलिसांनी योग्य नियोजन करून ९ ऑक्टोबर रोजी वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून त्यास शिताफीने ताब्यात घेतले व रात्री अटक केली. वैद्यकीय तपासणीनंतर त्यास नेकनूर पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते.

लॉकअपमध्ये आत्महत्येचा प्रयत्न

१० ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे सव्वादोनच्या (०२:१५) सुमारास आरोपी बालाजी शिंदे याने लॉकअपमधील पांघरुणाच्या कापडाचा वापर करून गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, लॉकअपच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस अंमलदारांच्या ही बाब वेळीच लक्षात आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तत्काळ हस्तक्षेप करत आरोपीला खाली उतरवून त्याचे प्राण वाचविले.

त्यानंतर त्यास तातडीने नेकनूरच्या शासकीय रुग्णालयात व नंतर पुढील उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, बीड येथे दाखल करण्यात आले. प्रकृती स्थिर असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

**न्यायालयीन कोठडी व नवा गुन्हा दाखल**

उपचारानंतर आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले, त्यानुसार त्याची बीड जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. तसेच कोठडीत असताना कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात इछड कलम २२६ अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळल्याने पोलीस प्रशासनाचे कौतुक होत आहे

# तब्बल १६ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

बीड । प्रतिनिधी

गेल्या १६ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या एका फरारी आरोपीला पकडण्यात शिवाजीनगर पोलिसांना यश आले आहे. संजय रामदास पवार (रा. सावरगाव, ता. गेवराई, जि. बीड) असे जेरबंद करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात सन २०१० मध्ये भा.दं.वि. कलम ३९२ आणि ३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यात (गु.र.नं. २४०/२०१०) आरोपी संजय पवार हा गुन्हा दाखल झाल्यापासूनच फरार झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक सातत्याने प्रयत्नरत होते. अखेर गोपनीय माहितीच्या आधारे विशेष पथकाने सापळा रचून त्याला मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस उपअधीक्षक नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश पंडित, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस हवालदार रवींद्र आघाव आणि पोलीस अंमलदार शिवदास घोलप यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# नवरात्र महोत्सवानिमित्त ११ ते २६ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील श्री रेणुकादेवी व मुळजोगाई देवस्थानचा ३७ वा वार्षिक महोत्सव रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आसल्याची माहिती देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी दत्तात्रय आंबेकर व उत्सवाचे प्रमुख नानाश्री यादव यांनी दिली आहे .

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी या देवस्थानचे मुख्य पुजारी कै. शिवाजीराव आंबेकर, कै. मुकुंदाप्पा यादव, कै. श्यामलालजी मोदी, कै. बी एन. सातपुते, कै. ताराचंदजी परदेशी यांच्या प्रेरणेने व

वैकुंठवासी ह भ प माधव महाराज शास्त्री व ह भ प रामकिसन महाराज पवार यांच्या आशीर्वादाने आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात कीर्तन, भजन, हरिपाठ, अभिषेक, सप्तशतीपाठ, होम-हवन, पालखी सोहळा व आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाची सुरुवात रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता योगेश परदेशी यांच्या हस्ते घटस्थापनेने व विष्णू सेठ बजाज यांच्या हस्ते गाथा पूजनाने होणार आहे. त्यानंतर दररोज सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते ८ सप्तशतीपाठ, ८ ते ९ अभिषेक, ९ ते ११ गाथ्यावरील भजन, ११ ते १ हरिकीर्तन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि ६ ते ७ आरती असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.



महोत्सवात दररोज सकाळी ११ ते १ या वेळेत नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. यामध्ये प.पू. बालासाहेब महाराज कुलकर्णी, प.पू. विकास महाराज गडदे, प.पू. अमोल गोरे महाराज सोनेपेठकर, प.पू. पांडुरंग महाराज कोकाटे (नांदगाव), प.पू. गुरुवर्य अच्युत महाराज जोशी, प.पू. अंबादास महाराज चिक्षे, प.पू. श्रीकृष्ण महाराज चवार (आसरडोह), प.पू. आकाश पाटील महाराज (धानोरा), प.पू. प्रमोद महाराज आवाड, प.पू. गोविंद महाराज सुकरे, प.पू. शिवाजी महाराज ठोंबरे, प.पू. प्रभाकर महाराज उगले, प.पू. पांडुरंग महाराज तिडके, प.पू. विठ्ठल महाराज पुरी तसेच प.पू. गुरुवर्य किसन महाराज पवार यांच्या काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अशोक सेठ मोदी यांच्या हस्ते होम-हवन पूजे सह पूर्णाहुती होणार असून दुपारी ४ वाजता तहसीलदार मा. विलास तरंगे यांच्या हस्ते श्रींची आरती व नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांच्या हस्ते मुळं जोगाईची आरती होऊन श्री ची मिरवणूक काढण्यात येणार आहे. या उत्सवात ११ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता महाराष्ट्राचे प्रख्यात गायक सुभाष शेष यांचा कार्यक्रम व दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता श्रीकृष्ण घोटकर यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम, संत सावता महाराज भजनी मंडळ, माळी चौक, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, आनंद नगर, सविता देशमुख यांचे सप्तश्रृंगी भजनी मंडळ, मध्यमवर्ती हनुमान भजनी मंडळ आणि दक्षिणमुखी भजनी मंडळ यांचा सहभाग राहणार आहे. रविवार दि. २५ ऑक्टोबर रोजी ह भं प किसन महाराज पवार यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार असून सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत स्थानिक आराधी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ह भं प अमोल महाराज घोडके, विनोद जाधव, प्रमोद पाटील, परमेश्वर दोनगहू, ओम दोनगहू, अर्जुन काटे, अंकुश शिनगारे, संतोष फुटाने, रामचंद्र बळे, गणेश आंबेकर, रजनीकांत हुलगुंडे, मंचक मोरे, रणजित लोमटे, शंकर कदम, रुद्राक्ष जाधव, बळीराम कदम, भारत कदम, अभिमन्यू मगर, राहुल मोदी, लखन मोदी, टिंकू परदेशी, मनोज सेलमोकर, पराग तांबोळी, शामल आंबेकर, प्रांजली आंबेकर ही मंडळी प्रयत्न करत आहे.

# केंद्रीय पथकाकडून मोरगाव परिसरातील पाणीटंचाईची पाहणी

## पाझर तलाव कोरडा; जलसंधारण, पाणीपुरवठा आणि पीक नुकसानीचा घेतला आढावा

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने बीड तालुक्यातील मोरगाव परिसरातील पाणीटंचाई, जलसंधारणाची कामे आणि शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी मोरगाव येथील दराडे वस्तीवरील पाझर तलावाची तसेच परिसरातील विहिरींची पाहणी करून पाणी उपलब्धतेची स्थिती जाणून घेण्यात आली. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या भागातील परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी पथकाला पाझर तलावाची क्षमता आणि सद्यस्थितीची माहिती दिली.

मोरगाव येथील नागनाथ मंदिराजवळ असलेल्या पाझर तलावाची पाणी साठवण क्षमता ०.१२१ टीएमसी आहे. मात्र, सध्या या तलावात पाणीसाठा शून्य असल्याचे पाहणीत निदर्शनास आले. तलाव पूर्णपणे कोरडा पडल्यामुळे परिसरातील पाणीटंचाईची तीव्रता स्पष्ट झाली. पथकाने तलावाची स्थिती



जाणून घेत जलसंधारणाच्या कामांची आवश्यकता आणि उपलब्ध पाणीस्रोतांच्या स्थितीबाबत माहिती घेतली. पथकाने परिसरातील प्रभू दराडे या शेतकऱ्याच्या विहिरीचीही पाहणी केली. यावेळी विहिरीतील पाण्याची पातळी, उन्हाळ्यातील पाणी उपलब्धता आणि पाण्याच्या उपशामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत स्थानिकांकडून माहिती घेण्यात आली. परिसरातील पाणीपुरवठा आणि टँकरच्या वापराबाबतही चर्चा झाली. पाणीपुरवठ्याच्या देयकांचा प्रश्न वेळेत मार्गी न लागल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात अडचणी येऊ शकतात, अशी बाब स्थानिकांनी मांडली. तसेच, मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होत असल्याने भूजलसाठा आणि विहिरींच्या पाणी उपलब्धतेवर परिणाम होत असल्याच्या मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली. पथकाने खंडाळा तलावाची पाहणी करून तेथील पाण्याची स्थिती आणि स्थानिक पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेतली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्रोतांचा वापर, पाणीसाठ्याचे नियोजन आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा यासंबंधीच्या अडचणी स्थानिकांनी निदर्शनास आणून दिल्या. यावेळी तलावांमधील गाळ काढणे आणि जलसंधारणाची कामे करण्यासाठी उपलब्ध निधी व योजनांबाबतही चर्चा झाली. यासाठी जिल्हा नियोजनासह विविध निधी स्रोत आणि कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) निधीचा वापर करण्याची शक्यता विचारात घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागांतर्गत ६२५ पाझर तलाव आणि ५५ सिंचन तलाव असल्याची माहिती देण्यात आली. पाझर तलावांचा मुख्य उद्देश भूजल पातळी वाढविणे हा असून, अशा तलावांमधून थेट सिंचनासाठी पाणी सोडण्याची व्यवस्था नसते, असेही स्पष्ट करण्यात आले. पाहणीदरम्यान मोरगावचे सरपंच लिंबाजी जाधव यांनी गावातील जलजीवन मिशन व पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याची समस्या मांडली. संबंधित ठेकेदाराकडून काम पूर्ण होत नसल्याने ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत मिळणार

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंची माहिती



पुणे / प्रतिनिधी

राज्यात दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांत एकूण १ कोटी ४९ लाख हेक्टर क्षेत्र आहे. पीक नुकसानीच्या पंचनाम्याचे ६७ टक्के काम पूर्ण झाले आहे. येत्या चार-पाच दिवसांत पंचनाम्याचे काम १०० टक्के पूर्ण होईल. त्याचा अहवाल समोर येईल आणि दिवाळीपूर्वीच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

राज्यात केंद्राच्या तीन पथकांकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी सुरु आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी या अडचणीच्या काळात महाराष्ट्राला मदत करु, असे आश्वासित केले आहे. सध्याचा काळ हा अडचणीचा, संकटाचा आहे. त्याला समोरे जावे लागेल. सरकार शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही. जेवढी जास्तीत जास्त मदत करता येईल तेवढी करु, अशी ग्वाही कृषिमंत्र्यांनी दिली. कृषिमंत्री भरणे यांनी शुक्रवारी (दि. १० ऑक्टोबर) सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील राजापूर आणि बुरलेवाडी येथे शेतीच्या बांधावर जाऊन खरीप पिकांची पाहणी केली. पावसाअभावी संपूर्ण शिवारातील पिकं करपून गेल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यात तीव्र दुष्काळ परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना केंद्र तसेच राज्य सरकारकडून भरीव मदत देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. केंद्रीय पथकाकडून सोलापूर जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना केंद्रीय पथकाने दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. पाणी व चारा नियोजनावर भर देण्याची सूचना त्यांनी केली आहे. तांत्रिक बाबीमुळे दुष्काळाच्या निकषांनुसार काही शेतकऱ्यांना मदत देता येऊ शकत नसली तरी त्यांनाही पिकांची परिस्थिती पाहून दुष्काळासंदर्भातील मदत दिली जाईल, असे आश्वासन याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत आहे. त्यामुळे सर्व नियम आणि निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# सोयाबीनचे पीक हातचे गेले ; चारा-पाण्यासाठी शेतकऱ्याची धडपड

## वैद्यकिन्हीतील दुष्काळाची दाहकता केंद्रीय पथकासमोर

कधी अतिवृष्टीने पिकांचे नुकसान, तर कधी पावसाअभावी हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो निसर्गाच्या या चक्रात शेतकरी मात्र आर्थिक संकटात सापडतो आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही गावात गेल्या ६५ दिवसांपासून पावसाचा थेंबही पडलेला नाही. त्यामुळे सोयाबीनचे पीक वाया गेले असून, पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. केंद्रीय पथकाच्या पाहणीदरम्यान उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांनी वैद्यकिन्ही येथील शेतात जाऊन पिकांच्या स्थितीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली. शेतकरी देवीदास भानदास यांच्या दोन हेक्टर क्षेत्रातील सोयाबीन पिकाची पाहणी करण्यात आली. सर्वसाधारण परिस्थितीत या क्षेत्रातून अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा असते; मात्र यंदा पावसाअभावी पीकच आले नसल्याची व्यथा त्यांनी मांडली. गेल्या वर्षी अतिपावसामुळे नुकसान झाले, तर यंदा पाऊसच नसल्याने पिके वाया गेली. सलग दोन वर्षांच्या या संकटामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. गावात पाणीटंचाई तीव्र झाली असून, जनावरांसाठी पाणी आणि चारा उपलब्ध करणे कठीण झाले आहे. चाऱ्याची किंमत चार हजार रुपये प्रतिटन झाल्याने पशुपालकांवरील आर्थिक भार वाढला आहे. रपाण्यासाठी जुन्या विहिरीचा आधार घ्यावा लागत असून, तेथेही दिवसातून केवळ तीन ते साडेतीन तास पाणी उपलब्ध होते. काही ठिकाणी पाटोदा येथून सुमारे ४० किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. गेल्या वर्षी गावातील सुमारे ८० टक्के शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता; मात्र मदत मिळाली नसल्याने यंदा विमा भरणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सुमारे ४० टक्क्यांवर आल्याची माहिती स्थानिक प्रतिनिधींनी दिली. दरम्यान, गावातील एकूण १,१०० हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ९५० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड आहे. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असून, उर्वरित क्षेत्रातील अन्य पिकांच्या नुकसानीचीही नोंद घेतली जात आहे, अशी माहिती तलाठी देशमुख यांनी दिली. ६५ दिवसांचा पावसाचा खंड, हातचे गेलेले पीक आणि जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता वैद्यकिन्हीतील परिस्थिती दुष्काळाचे गांभीर्य अधोरेखित करते. आता या संकटातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजनांची अपेक्षा आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म:१९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

## सोयाबीन वाळवत होती शेतकरी महिला

# केंद्रीय पथकाचा ताफा थांबला अन् जाणून घेतली व्यथा !

शेतात सोयाबीन वाळवत असलेली एक महिला पावसाअभावी हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याची खंत आणि त्याच वेळी दुष्काळाची पाहणी करण्यासाठी निघालेल्या केंद्रीय पथकाचा अचानक थांबलेला ताफा! बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील दाशखेड येथे घडलेल्या या प्रसंगातून दुष्काळाची झळ सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबाची व्यथा समोर आली.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करताना केंद्रीय पथकाने दाशखेड येथे थांबून शेतात सोयाबीन वाळवत असलेल्या रेखा जयंत कोकाटे यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आपल्या शेतातील सोयाबीन पिकाची अवस्था आणि उत्पादनातील मोठी घट पथकाला सांगितली. "गेल्या वर्षी ३० पोती सोयाबीन झाले होते; मात्र यंदा दीड-दोन एकर क्षेत्रात जेमतेम ४० किलो सोयाबीन मिळेल," अशी व्यथा रेखा कोकाटे यांनी मांडली. चांगली काळी जमीन असूनही पावसाअभावी पिकाला पुरेसे पाणी मिळाले नाही. त्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यांच्या पती जयंत बाप्पासाहेब कोकाटे यांच्या नावावर शेती आहे. यंदा जमिनीचा कस असूनही पावसाअभावी पीक अपेक्षेप्रमाणे आले नाही. हलक्या जमिनीतील पीक तर पूर्णपणे वाया गेले असून, चांगल्या जमिनीतील सोयाबीनही बाजारात विक्रीयोग्य राहिले नसल्याचे त्यांनी सांगितले.

शेताजवळून वाहणारी नदीही कोरडी पडली आहे. त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी पर्यायी स्रोत उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती स्थानिकांनी पथकासमोर मांडली. तलाठ्यांनी दाशखेड गावातील पीक नुकसानीचे पंचनामे केले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली. पथकाने शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून पिकांची अवस्था आणि नुकसानीची माहिती जाणून घेतली. एका बाजूला वाळवण्यासाठी शेतात पसरलेले सोयाबीन, तर दुसरीकडे पुढील हंगामाची चिंता रेखा कोकाटे यांच्याशी झालेला हा संवाद दुष्काळामुळे शेतकरी कुटुंबांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या संकटाची जाणीव करून देणारा ठरला.

# केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना

जर आपण केळी पिकाचा विचार केला तर सगळ्यात पटकन डोळ्यासमोर येतो तो जळगाव जिल्हा होय. महाराष्ट्रामध्ये जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक केळी पिकाची लागवड होते व उत्पादन देखील या जिल्ह्यात जास्त होते, म्हणून जळगाव जिल्ह्याला केळीचे आगार असे संबोधले जाते. जर आपण केळी पिकाचा विचार केला तर घडाच्या गुणवत्तेवर सर्व काही अवलंबून असल्यामुळे केळी पिकाची लागवड केल्यापासून उत्तम पद्धतीने काळजी घेणे खूप गरजेचे असते.

निर्यातक्षम उत्पादन घ्यायचे असेल तर केळी घडाची गुणवत्ता खूप महत्त्वाची भूमिका पार पाडते. घडाची गुणवत्ता वाढीसाठी काही छोटे परंतु महत्त्वाच्या उपाययोजना केल्या तर नक्कीच फायदा होऊ शकतो.

फण्यांची विरळणी करणे आवश्यक असते- केळी फळाच्या आकारमानामध्ये चांगले बदल करून येण्यासाठी घड लवकर परिपक्व होणे खूप गरजेचे असते. यासाठी फण्याची योग्य वेळी विरळणी करणे गरजेचे आहे. केळीच्या काही वानांमध्ये घडाला नऊ पेक्षा जास्त फण्या येतात. त्यामुळे अशा जास्त फण्या राहिल्या तर सर्वांना योग्य पोषण घटक न मिळाल्याने त्यांचे आकारमान एकसारखे राहत नाही व दर्जा ढासळतो. यासाठी एक घडावर सहा ते आठ फण्या ठेवून बाकीच्या विळ्याच्या साह्याने व्यवस्थितपणे कापून टाकणे गरजेचे आहे.



यामुळे फळे एकसारख्या आकाराची येतात.

जमिनीची मशागत- केळीच्या बागेतील जमीन वेळोवेळी स्वच्छ करणे गरजेचे असून ती कायम ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. केळी बागेतील जमिनीची मशागत लागवडीनंतर तीन चार महिन्यात सुरू करणे गरजेचे असून या कालावधीत कोळपणी देऊ शकतात. परंतु त्याच्या पुढे हाताने चाळणी करण्याचा सल्ला जाणकारांकडून दिला जातो. झाडाला थोडीशी उंच भर ठिबकसाठी करावी. या भरीचा फायदा हा वाऱ्यापासून झाडाचे संरक्षण करण्यासाठी होतो.

बुंध्यालगतचे उपठोंब काढणे- बऱ्याचदा केळीच्या झाडाच्या बुंध्याला उपठोंब येऊ लागतात व ते वेळोवेळी काढणे गरजेचे आहे. त्यामुळे रोपाला संरक्षण मिळते. हे ठोंब काढण्याचे काम झाडाला फुले येईपर्यंत करणे गरजेचे आहे.

केळीमध्ये जर मिश्र पिकांची लागवड करायची असेल तर त्यांची निवड करताना मुख्य पिकातील अंतर, अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींची खूप काळजी घेणे गरजेचे आहे. खासकरून केळी बागेला करायचा अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींचा विचार करून केळीला मोहोर आल्यावर अशी पिके घ्यावीत. यामध्ये लक्षात घ्यावे की आंतर पिके ही मोहराच्या विरुद्ध दिशेने हवीत व पिकापासून दूर असावी.

केळफुल कापणे आहे गरजेचे- जेव्हा केळीची पूर्ण निसवन होते तेव्हा सर्व फण्या केळ कमळातून तून बाहेर पडतात. दोन ते तीन दिवसात खाली उमलणारे केळफुल धारदार विळाच्या साह्याने व्यवस्थित कापून घ्यावे. त्यामुळे केळफुलाला अनावश्यक होणारा अन्नपुरवठा हा वाढणाऱ्या घडास मिळतो घडाच्या उत्तम वाढीस मदत होते. तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे केळ फुलांमध्ये आसरा घेणाऱ्या रेड रस्ट थ्रीप्स या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

नरकळ्या खुरडून टाकणे- नरकळ्या काढून टाकल्यामुळे घडावरील फळ वाढण्यासाठी मदत होते आणि फांदीचे वजन वाढते. त्यामुळे या नरकळ्या एक दोन हात लांबीवर एका बोटाचे अंतर ठेवून कापून टाकने महत्वाचे आहे.



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ ५




## थोडक्यात

### बीड जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्राची केंद्रीय पथकाकडून पाहणी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने आज सकाळी पाली (ता. जि. बीड) येथील स्वयंचलित हवामान केंद्राला भेट देऊन यंत्रणेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हवामान केंद्रावरील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा आणि पर्जन्यमान नोंदविण्याच्या यंत्रणेची माहिती जाणून घेतली. या केंद्रातून दर दहा मिनिटांनी हवामानविषयक माहिती संकलित केली जाते. यावेळी राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग आणि जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन उपस्थित होते. जिल्ह्यातील ७९ महसूल मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यरत असून, या यंत्रणेद्वारे जिल्ह्यातील पर्जन्यमानाची आकडेवारी संकलित केली जाते, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती पथकासमोर मांडली. पिण्याच्या पाण्यासह जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. दुष्काळामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रताही त्यांनी निदर्शनास आणून दिली.

### मोरगाव येथे केंद्रीय पथकाची सोयाबीन पिकाच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी

पेरणीपासून पीक वाढविण्यापर्यंत केलेला खर्च, घेतलेले कष्ट आणि चांगल्या उत्पादनाची आशा मात्र पावसाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्यांच्या या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. बीड तालुक्यातील मोरगाव येथे केंद्रीय पथकाने सोयाबीन पिकाच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली, तेव्हा शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता समोर आली. मोरगाव येथील बाबासाहेब चोखामार यांच्या गट क्रमांक २६१ मधील शेतात दोन एकरांवर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. सर्वसाधारण परिस्थितीत एकरी ७ ते ८ क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. मात्र, पावसाअभावी पिकाची वाढ खुंटली असून, आता एकरी जेमतेम ५० किलो उत्पादन मिळण्याची शक्यता असल्याची माहिती कृषी सहाय्यकांनी पथकाला दिली. सोयाबीन पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने त्याचे मोठे नुकसान झाले. अपेक्षित वाढ न झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पिकासाठी केलेला खर्चही निघेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांसमोर उभी आहे. गावात सुमारे १,४०० शेतकरी असून, त्यापैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गावनिहाय नुकसानीची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांचे पीक अपेक्षेप्रमाणे आलेच नसल्याची व्यथाही स्थानिकांनी मांडली. यानंतर केंद्रीय पथकाने किरण भास्कर केकाण यांच्या गट क्रमांक २५८ मधील शेताचीही पाहणी केली. त्यांच्या शेताच्या नुकसानीची नोंद घेण्यात आली. हिरव्यागार पिकांतून सोन्यासारखे उत्पादन मिळण्याची आशा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता उत्पन्नाचा गंभीर प्रश्न उभा आहे. मोरगावमधील प्रत्यक्ष पाहणीतून पावसाअभावी शेतीवर ओढवलेल्या संकटाची आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेची तीव्रता अधोरेखित झाली.

### वैजाळ्यात केंद्रीय पथकाने साधला शेतकऱ्यांशी संवाद

पाटोदा तालुक्यातील वैजाळा येथे केंद्रीय पथकाने कांदा, झेंडू आणि मका उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. पाण्याअभावी पिकांची झालेली अवस्था, वाढत्या तापमानाचा परिणाम, उत्पादनातील घट आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता याबाबत पथकाने शेतकऱ्यांकडून माहिती घेतली. कांदा उत्पादक बंकट शेवराव येडे यांनी पाण्याच्या टंचाईमुळे कांद्याची लागवड १० एकरांवरून यंदा केवळ एक एकरावर मर्यादित करावी लागल्याचे सांगितले. शेततळ्यातही पाणी नसल्याने पिकाच्या भवितव्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. झेंडू उत्पादक पांडुरंग बाबासाहेब मस्के आणि मका उत्पादक काकासाहेब नामदेव येडे यांच्याशीही पथकाने संवाद साधला. वाढत्या तापमानामुळे झेंडूच्या फुलांचा आकार लहान होत असून, पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. पाण्याची प्रतीक्षा, घटते उत्पादन आणि वाढता खर्च अशा संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा केंद्रीय पथकाने जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या शेतातील परिस्थिती आणि त्यांच्या अनुभवांतून दुष्काळाची तीव्रता अधोरेखित झाली.

### दासखेडमध्ये केंद्रीय पथकासमोर शेतकऱ्यांची व्यथा

पेरणी, बियाणे, खते आणि फवारण्यांवर हजारो रुपये खर्च करूनही पावसाअभावी सोयाबीनचे पीक करपले. तीन एकरांत ५४ हजार रुपये खर्च करून हाती केवळ ९ ते १० हजार रुपयांचे उत्पादन येण्याची शक्यता! बीड जिल्ह्यातील दासखेड येथे केंद्रीय पथकाने पाहणी केली असता शेतकऱ्यांच्या या व्यथा समोर आल्या. सुधाकर नवनाथ ठोंबरे यांनी तीन एकरांत सोयाबीनची पेरणी केली; मात्र जेमतेम दीड ते दोन क्विंटल उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. तर बबनराव ठोंबरे यांच्या अडीच एकरांतील सोयाबीनमधून केवळ ६० ते ७० किलो उत्पादन मिळेल, अशी स्थिती आहे. पावसाअभावी विहिरी कोरड्या पडल्या असून, जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. हार्वेस्टरने काढणी केल्याने भुसकट गोळा करता येत नसल्याने चाऱ्याची अडचण अधिकच वाढली आहे. शेततळ्यांसाठी ५० हजार रुपये अनुदान आणि फळबागांसाठी हेक्टरी दोन लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. डाळिंब व मोसंबीच्या बागा पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याने वेळेत मदत मिळाली नाही, तर मोठे नुकसान होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली. खर्च मोठा, उत्पादन नगण्य आणि चारा-पाण्याची चिंता दासखेडमधील शेतकऱ्यांची ही व्यथा दुष्काळाची तीव्रता अधोरेखित करते.

### चारा जेमतेम १५ दिवसांचा; पुढे जनावरांना खाऊ घालायचे काय?

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील बेडूकवाडी येथील वैभव अंकुश शिंदे आणि अंकुश परसराम शिंदे यांच्यासमोर दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत आहे. सध्या घरचा ज्वारीचा कडबा आणि नेपियर गवत उपलब्ध असले, तरी चारा संपल्यानंतर जनावरांना जगवायचे कसे, हा प्रश्न त्यांना सतावत आहे. बाहेरून चारा विकत घ्यायचा झाल्यास प्रति टन ११ हजार रुपये खर्च येतो. दररोज सुमारे १३० लिटर दूध संकलन करणाऱ्या या शेतकऱ्यांसाठी वाढता चारा खर्च मोठे आर्थिक आव्हान ठरत आहे. त्यामुळे भविष्यात चारा टंचाई निर्माण झाल्यास शासनाने चारा डेपो सुरू करून मदत करावी, अशी अपेक्षा आहे. पशुधन हेच शेतकऱ्यांचे बळ; मात्र चारा-पाण्याची चिंता वाढली, तर हे बळ टिकवायचे कसे ? हा प्रश्न भेडूकवाडीतील शेतकऱ्यांच्या व्यथेतून समोर येत आहे.

# भरपाई दिवाळीपूर्वी देण्यासाठी पीक पाहणी वेळेत पूर्ण करा-अग्रवाल

## पावसाच्या खंडामुळे ७.४२ लाख हेक्टरवरील पिके बाधित; धरणांतील उपयुक्त पाणीसाठा १४.६१ टक्क्यांवर, चारा ४७ दिवस पुरेल

बीड। प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानीपोटी भरपाई दिवाळीपूर्वी मिळावी, यासाठी पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून नुकसानीची अचूक नोंद घ्यावी. सोयाबीनचे प्रलंबित पीक कापणी प्रयोग दिवाळीपूर्वी पूर्ण करावेत. दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष परिस्थिती आणि तांत्रिक आकडेवारीची पडताळणी करावी. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्धतेचे प्रभावी नियोजन करावे, अशा सूचना केंद्रीय पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांनी दिल्या. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आलेल्या केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन पथकाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयात पीकस्थिती, पाणीटंचाई, भूजल पातळी, चारा उपलब्धता आणि शेतकरी मदत वितरणाचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील परिस्थितीचे सादरीकरण केले. बैठकीला राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे व पाटबंधारे विभाग अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप यांच्यासह विविध




विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५६६.१ मिलिमीटर असून, यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान ३५६ मिलिमीटर पाऊस झाला. हे प्रमाण सरासरीच्या ६२.८९ टक्के आहे. ऑगस्टमध्ये सरासरीच्या १८.४ टक्के, तर सप्टेंबरमध्ये ४१.६ टक्के पाऊस झाला. पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. जिल्ह्यात खरीप हंगामात ७ लाख ८७ हजार २१८ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून, त्यापैकी ७ लाख ४२ हजार १६३ हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. जिल्ह्यातील १ हजार ३५३ गावांमधील सुमारे ८ लाख २२ हजार ३६० शेतकरी या नुकसानीने प्रभावित झाल्याचे अहवालात नमूद आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका आणि बाजरी या पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाला आहे. काही भागांत सोयाबीनच्या शेंगांचा अपुरा विकास, दाण्यांचा लहान आकार, कापसात फुलगळ आणि वाढ खुंटण्याची समस्या दिसून आली. तूर, मूग व उडदाच्या शेंगा धरण्यावरही परिणाम झाला आहे. पीक कापणी प्रयोगांच्या प्राथमिक आकडेवारीनुसार, सोयाबीनचे मागील पाच वर्षांतील सरासरी उत्पादन हेक्टरी १ हजार ५३४.२ किलो होते. यंदाच्या हंगामातील उपलब्ध प्रयोगांनुसार हे उत्पादन हेक्टरी ४१० किलो नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट झाल्याचे दिसून येते. ८ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील पीक कापणी प्रयोगांचे ३ हजार १३२ उद्दिष्ट असताना ९५७ प्रयोग पूर्ण झाले होते. सोयाबीनच्या ५७६ नियोजित प्रयोगांपैकी ३१० प्रयोग पूर्ण झाले. याशिवाय बाजरीचे १७४, मूगाचे ३११, उडदाचे १२२ आणि मक्याचे २९ प्रयोग पूर्ण झाले होते. कापूस व तूर पिकांचे प्रयोग प्रलंबित होते. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून त्यांचे योग्य पर्यवेक्षण करावे. शेतकऱ्यांचा सहभाग वाढवावा आणि नोंदविलेल्या उत्पादनाची प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करावी, अशा सूचना अग्रवाल यांनी दिल्या. दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी पिकांची स्थिती, पेरणी क्षेत्र, मातीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता, वनस्पती स्थिती निर्देशांक आणि जलसाठा निर्देशांक या बाबींचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यातील अकराही तालुक्यांमध्ये पावसाच्या खंडाचे वेगवेगळे परिणाम दिसून येत आहेत. वनस्पती स्थिती निर्देशांकानुसार बहुतांश तालुक्यांतील परिस्थिती गंभीर श्रेणीत नोंदविण्यात आली. मातीतील ओलाव्याच्या पर्याप्तता निर्देशांकानुसार आष्टी, धारूर, गेवराई, केज आणि शिरूर कासार तालुक्यांमध्ये गंभीर स्थिती आढळली. दुष्काळ निश्चितीच्या ट्रिगर-१ व ट्रिगर-२ निकषांसह राष्ट्रीय कृषी दुष्काळ व्यवस्थापन केंद्राच्या माहितीचा विचार करावा. तालुकानिहाय माहिती तक्त्यांच्या स्वरूपात सादर करून प्रत्यक्ष पाहणी, पर्जन्यमान आणि तांत्रिक निर्देशकांच्या आधारे वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा, असे अग्रवाल यांनी सांगितले. जिल्ह्यातील १६४ मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये ३.९५८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून, तो एकूण साठवण क्षमतेच्या केवळ १४.६१ टक्के आहे. जलसाठा निर्देशांकानुसार १६३ प्रकल्पांमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक तूट नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि शेतीसाठी पाण्याचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. सप्टेंबर २०२६ मधील नोंदीनुसार, जिल्ह्यातील भूजल पातळीत सरासरी ४.५५ मीटरने घट झाली आहे. पाणीटंचाई निवारण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहिरी व विंधनविहिरींचे अधिग्रहण आणि पर्यायी जलस्रोतांचा वापर यावर भर देण्यात आला आहे. टँकरच्या फेऱ्या, प्रत्यक्ष उपलब्धता आणि गावनिहाय मागणी यांची नियमित पडताळणी करावी. बीड शहरासाठी बिंदुसरा व माजलगाव धरणांशी संबंधित जलस्रोतांचा वापर, पाणीपुरवठा यंत्रणेची दुरुस्ती आणि ग्रामीण भागासाठी टँकर भरण्याची व्यवस्था यांसारख्या उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई शहरासाठीही पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जनावरांसाठी उपलब्ध चारा सध्याच्या गरजेनुसार सरासरी ४७ दिवस पुरेल, असा अंदाज आहे. तालुकानिहाय उपलब्धतेत मोठी तफावत असून, शिरूर कासार तालुक्यातील चारा केवळ ८ दिवस, तर गेवराई तालुक्यात १९.६ दिवस पुरेल. आष्टी तालुक्यातही चारा सुमारे २२.४ दिवस पुरण्याची स्थिती आहे. संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन चारा पिकांचे क्षेत्र वाढविणे, मका बियाण्यांचे वितरण आणि रब्बी हंगामातील चारा उत्पादनाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ४९ हजार ७४० किलो मका बियाण्यांचे वितरण करण्यात आले असून, त्यातून १ हजार ९८९.६ हेक्टर क्षेत्रावर लागवड आणि ९९ हजार ४८० मेट्रिक टन हिरवा चारा उत्पादन अपेक्षित आहे.

### पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त तात्यासाहेब वाघमारे यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी



अंबड येथील पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक तात्यासाहेब बाबुराव वाघमारे यांचे शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आज हिंदू स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. तात्यासाहेब हे अत्यंत मनमिळाऊ, प्रेमळ व सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने वाघमारे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व हरपले आहे.त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## बीड शहरालगतच्या बिंदुसरा तलावाची केंद्रीय पथकाकडून पाहणी

### धरणातील उपयुक्त पाणीसाठा ५ टक्क्यांवर ; पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा घेतला आढावा

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने बीड शहरालगतच्या पाली येथील बिंदुसरा तलावाची पाहणी करून धरणातील पाणीसाठा आणि शहरासह परिसरातील पाणीपुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेतला. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाला अधीक्षक अभियंता, पाटबंधारे पल्लवी जगताप यांनी धरणातील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्यासाठीचे आरक्षण आणि उपलब्ध जलस्रोतांबाबत माहिती दिली.

बिंदुसरा तलावात ३० जून २०२६ रोजी १७ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता.



सध्याच्या स्थितीत तो केवळ ५ टक्क्यांवर आला आहे. मागील वर्षी याच धरणात १०० टक्के पाणीसाठा होता, अशी माहिती पथकाला देण्यात आली. धरणाचा एकूण साठा ०.२८ पीएमसी, तर उपयुक्त पाणीसाठा ०.२५ पीएमसी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पाणीसाठ्यातील घट लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांच्या वापराबाबत पथकाने सविस्तर चर्चा केली. बीड शहराला दररोज सुमारे ३८ एमएलडी पाण्याची गरज आहे. त्यापैकी २८ एमएलडी पाणी माजलगाव धरणातून, तर उर्वरित पाणी बिंदुसरा तलावातून उपलब्ध होत असल्याची माहिती देण्यात आली. बिंदुसरा तलावातील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी पर्यायी स्रोतांचा वापर आणि पाणी उपलब्धतेचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. यंदा सिंचनासाठी पाणी न देता उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्याचे नियोजन असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहराची पिण्याच्या पाण्याची गरज आणि आगामी काळातील पाणीपुरवठ्याचे नियोजन यांची माहिती घेऊन केंद्रीय पथकाने परिस्थितीचा आढावा घेतला.

## पाथर्डीच्या क्रीडा विश्वात अभिमानास्पद कामगिरी

### संत ज्ञानेश्वर विद्यालयाची श्रुती धायतडक राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

पाथर्डी प्रतिनिधी

अपार जिद्द कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण सराव यांच्या जोरावर पाथर्डीच्या क्रीडा वर्तुळात संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची गुणी विद्यार्थिनी श्रुती जगन्नाथ धायतडक हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे १७ वर्षे वयोगटातील ५३ किलो वजन गटात पुणे विभागीय स्तरावरील शालेय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत तिने थेट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले असून तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे पाथर्डी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अत्यंत अटीतटीच्या व स्पर्धात्मक झालेल्या या विभागीय स्पर्धेत श्रुतीने आपल्या



ताकदीची आणि उत्कृष्ट तंत्रशुद्ध खेळाची चुणूक दाखवत उपस्थितांची मने जिंकली आहेत ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील मुलीने आपल्या आत्मविश्वासाच्या बळावर मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे या यशामागे तिचे दिवसरात्र केलेले परिश्रम आणि विद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक शिक्षक शिवाजी शेकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही नेहमीच अग्रेसर राहणाऱ्या संत ज्ञानेश्वर विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या शाळेच्या लौकिकात श्रुतीच्या या यशाने अराणखी एक सुवर्णमय अध्याय जोडला आहे श्रुती धायतडक च्या या घवघवीत यशाबद्दल सहदेव दादा शिक्षण प्रसार मंडळाचे संस्थेचे सचिव महेंद्र शिरसाट मुख्याध्यापक सुरेश मिसाळ पर्यवेक्षक आत्माराम दहिफळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी श्रुतीचा गौरव करून तिला पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

## लांब उडी स्पर्धेत प्रीतम वायबसेची विभागीय स्तरावर निवड

पाटोदा । प्रतिनिधी



सावरगाव सोनेगाव, ता. पाटोदा : येथील सिद्धेश्वर विद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्रीतम बाजीराव वायबसे हिने लांब उडी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हास्तरावरून विभागीय स्तरावर निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे सिद्धेश्वर विद्यालयासह सावरगाव सोनेगाव परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

क्रीडा क्षेत्रात जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर प्रीतमने मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. तिच्या या निवडीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. प्रीतमच्या या यशाबद्दल सिद्धेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच ग्रामस्थांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेतही तिने उत्तम कामगिरी करून यशाची नवी शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. प्रीतम बाजीराव वायबसे हिचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील क्रीडा वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

# पावसाच्या ओढीने बीड जिल्हा होरपळला; केंद्रीय पथकासमोर दुष्काळाचे भीषण वास्तव

### ५४ हजारांच्या खर्चातून हाती केवळ १० हजार; शेतीचे अर्थकारण कोलमडले

बीड। प्रतिनिधी

पावसाच्या प्रदीर्घ ओढीमुळे बीड जिल्ह्यातील दुष्काळाने गंभीर रूप धारण केले आहे. खरीप पिके करपली असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तीव्र झाला आहे. केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने दोन दिवस जिल्ह्याचा दौरा केला. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग आणि जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन यांच्या पथकासमोर शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा आणि मागण्या मांडल्या. बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बिंदुसरा तलावात सध्या केवळ ५ टक्के उपयुक्त साठा उरला आहे. गेल्या वर्षी याच काळात हे धरण १०० टक्के भरलेले होते. शहराला दररोज लागणाऱ्या ३८ एमएलडी पाण्यासाठी आता माजलगाव धरणावर अवलंबून राहावे लागणार आहे. उपलब्ध साठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.



ग्रामीण भागात मोरगाव, वैद्यकिन्ही आणि दासखेड येथील पाझर तलाव कोरडे पडले असून विहिरींनी तळ गाठल्याने जलसंकट अधिक गडद झाले आहे.

सलग ६५ दिवस पावसाचा थेंबही न पडल्याने सोयाबीनचे पीक शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत करपले. दासखेड येथील शेतकरी सुधाकर ठोंबरे यांनी तीन एकरांत ५४ हजार रुपये खर्चून पेरणी केली. मात्र त्यातून केवळ ९ ते १० हजार रुपयांचे (दीड-दोन क्विंटल) उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. महिला शेतकरी रेखा कोकाटे यांच्या दीड-दोन एकरांत केवळ ४० किलो सोयाबीन निघेल, अशी स्थिती आहे. लाखो रुपये खर्चून उभ्या केलेल्या डाळिंब आणि मोसंबीच्या बागाही पाण्याअभावी जळण्याच्या मार्गावर आहेत. खरिपाच्या नुकसानीसोबतच पशुधन कसे जगवायचे, हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. पाटोदा तालुक्यातील बेडूकवाडी येथील वैभव आणि अंकुश शिंदे या बंधूंची व्यथा जिल्ह्यातील पशुपालकांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. दररोज सुमारे १३० लिटर दूध संकलन करणाऱ्या या कुटुंबाकडे घरचा चारा केवळ १५ दिवस पुरेल इतकाच उरला आहे. बाहेरून चारा खरेदी करायचा तर प्रति टन ११ हजार रुपये मोजावे लागतात. सोयाबीनची वाढ खुंटल्याने नाइलाजाने हार्वेस्टरने काढणी करावी लागली, त्यामुळे जनावरांसाठी भुसकटही उपलब्ध नाही. या संकटातून सावरण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. फळबागा जगवण्यासाठी हेक्टरी दोन लाख रुपयांची तातडीची मदत, शेततळ्यांसाठी ५० हजार रुपये अनुदान आणि जनावरांचे प्राण वाचवण्यासाठी तात्काळ 'चारा डेपो' सुरू करणे, या मागण्या त्यांनी लावून धरल्या. शासन या हतबल शेतकऱ्यांना कधी आणि किती दिलासा देणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. पाटोदा तालुक्यातील वैजाळा येथे केंद्रीय पथकाने कांदा, झेंडू आणि मका उत्पादकांशी संवाद साधला. पाण्याअभावी पिकांची झालेली अवस्था, वाढत्या तापमानाचा परिणाम, उत्पादनातील घट आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता याबाबत पथकाने माहिती घेतली. कांदा उत्पादक बंकट शेवराव येडे यांनी पाणीटंचाईमुळे कांद्याची लागवड १० एकरांवरून यंदा केवळ एक एकरावर आणावी लागल्याचे सांगितले. शेततळ्यातही पाणी नसल्याने पिकाच्या भवितव्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. झेंडू उत्पादक पांडुरंग बाबासाहेब मस्के आणि मका उत्पादक काकासाहेब नामदेव येडे यांनीही वाढत्या तापमानामुळे झेंडूच्या फुलांचा आकार लहान होत असल्याचे आणि पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम झाल्याचे सांगितले. पाण्याची प्रतीक्षा, घटते उत्पादन आणि वाढता खर्च अशा संकटांना तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनुभवांतून दुष्काळाची तीव्रता अधोरेखित झाली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ | ६

# शेतकऱ्यांना हेक्टरी ८० हजार रु. नुकसान भरपाई द्या -आमटे

## केंद्रीय पथकास शेतकरी हक्क मोर्चाची मागणी, कापूस व सोयाबीन खर्चाचे नांगरटी पासूनचे विवरण देऊन मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक आले असताना शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने केंद्रीय पहाणी पथकास शेतकऱ्याच्या नुकसान झालेल्या कापूस व सोयाबीन पिकाचा नांगरटी पासून ते शेतात वाळलेल्या सोयाबीन पर्यंत व कापसाच्या तिसऱ्या फवारणी पर्यंतचा एकूण खर्चाचे विवरण देऊन शेतकऱ्यांना हेक्टरी ७० ते ८० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे व सहकाऱ्यांनी केली.

शेतकऱ्याचे दुष्काळामुळे अतोनात नुकसान झाले आहे शेतकऱ्याचे सोयाबीन कापूस पिकाचा नांगरट, मोगडा, पाळी, पेरणी, रेगाटी,बियाणे, खते, खुरपणी, फवारणी सोयाबीन पिकाला एकरी सुमारे २६,६०० ते ३०,००० म्हणजे हेक्टरी ६६,५०० ते ७०,०००रुपये व कापूस पिकाला सुमारे एकरी २९,५०० ते ३५,००० हेक्टर ७३,७५० ते ८०,००० अशा पद्धतीने शेतकऱ्यांना सोयाबीन व कापूस पिकासाठी हेक्टरी ७० ते ८० हजार रुपये निव्वळ खर्च आलेला आहे. केंद्रीय पाहणी पथकांनी शेतकऱ्याच्या नुकसानीचे



योग्य मूल्यमापन करून शेतकऱ्याला हेक्टरी ८० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली.

शेतकऱ्यांना सोयाबीन पिकासाठी कमीत कमी हेक्टरी ६६ हजार रुपये निव्वळ खर्च आलेला आहे शेतकऱ्याला हेक्टरी ३७ ते ४५ क्विंटल सोयाबीन होते सुमारे दोन ते अडीच लाखाचे उत्पन्न होणे अपेक्षित असताना काहीही उत्पन्न झालेले नाही.

### एकरी सोयाबीन खर्च

नांगरट – २,४००, मोगडा – १,५००, पाळी – १,५००, पेरणी – १,८०० बियाणे – ३,३०० खत – ४,५०० खुरपणी – ३,००० फवारणी क्र.१ – १,८००, फवारणी क्र२ – १,८०० सोयाबीन काढणी म्हणजे गोळा करणे=५,००० (पीक आलं नाही तरी काढून टाकावे लागते) एकूण २६६०० म्हणजे हेक्टरी ६६५०० रुपये.

कापूस पिकाला प्रतिवर्षी शेतकऱ्याला एकरी दहा ते बारा कुंटल कापूस म्हणजेच हेक्टरी २५ ते ३० क्विंटल पेक्षा जास्त कापूस होत असतो सुमारे तीन ते साडेतीन लाखाचे उत्पन्न कापसातून होणे अपेक्षित असताना शेतकऱ्याला यावर्षी काही उत्पन्न झालेले नाही.

शेतकऱ्याचा नुकसानाचा विचार केलेला असताना शेतकऱ्याला झालेला खर्च व शेतकऱ्यांच्या खर्चाच्या तिप्पट रक्कम असा विचार केला असता शेतकऱ्याला हेक्टरी अडीच ते तीन लाख

### एकरी कापूस खर्च

नांगरट – २,४००, मोगडा– १,५००, पाळी – १,५००, रेघाटी व कापूस लावणे –१,८००, बियाणे तीन बॅग – २,७०० खते – ४,५००, खुरपणी – ३,०००, फवारणी क्र.१– १,८०० बैल पाळी– १,८००, खुरपणी क्र.२ – ३,०००, फवारणी क्र२ – २,५००, फवारणी क्र.३ – ३००० एकूण २९,५०० म्हणजे हेक्टरी ७३,७५० रुपये

रुपये मिळणे अपेक्षित असताना फक्त शेतकऱ्यांना किमान शेतकऱ्याचा झालेला खर्च तरी द्यावा अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने दुष्काळी केंद्रीय पाहणीपतकाकडे करण्यात आलेली आहे. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ.गणेश ढवळे, रामधन जमले, हनुमान घोडके, भीमराव कुटे, अशोक सुरवसे,बाजीराव ढाकणे, गणेश वटारे, राम माने, शेख युनूस, बाळासाहेब मोरे, डॉ.संजय तांदळे, रमेश डोके, इत्यादी सहकाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# नेकनूर पोलीस कोठडीत आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न; आरोपीला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी

बीड । प्रतिनिधी

दरोड्याच्या गुन्ह्यामध्ये गेल्या दिड वर्षापासून फरार असलेला आरोपी बालाजी शिंदे याला नेकनूर पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याने पोलीस कोठडीतच आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रसंग टळला. त्याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी दिली.



नेकनूर पोलीस ठाणे गु.र.नं. ११७/२०२५, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१० (२) अन्वये दाखल असलेल्या दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यात मागील दीड वर्षापासून पोलिसांना गुंगारा देणारा फरार अट्टल आरोपी बालाजी ऊर्फ आबड्या अजिनाथ शिंदे (वय २२ वर्षे, रा. मांडवा, ता. वाशी, जि. धाराशिव) यास नेकनूर पोलिसांनी दिनांक ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून शिताफीने ताब्यात घेऊन रात्री १०:४७ वाजता अटक केली होती. सदर आरोपी हा अटक व कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी स्वतःला इजा करून घेण्याच्या सवयीचा असल्याने त्यास पकडणे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान होते. मात्र, बीड पोलिसांनी योग्य नियोजन व विशेष खबरदारी घेऊन आरोपीस अटक करण्यात यश मिळविले. अटकेनंतर आरोपीची वैद्रद्यकीय तपासणी करून त्यास नेकनूर पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते.

दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे सुमारे ०२:१५ वाजण्याच्या सुमारास आरोपीने लॉकअपमधील ◀◀ पान ३ वर

# संस्कार विद्यालयाच्या शिक्षकाची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील संस्कार विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत असलेले संदीप जोशी यांनी बीड शहरा जवळच असलेल्या खंडेश्वरी मंदिर परिसरामध्ये एका विहिरीमध्ये उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी समोर आली. या घटनेने सर्वांचा हळहळ व्यक्त केली जात आहे.



बीड शहरातील संस्कार विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत असलेले संदीप जोशी हे शाळेमध्ये दिवसभर आपले कर्तव्य बजावून त्यानंतर अचानक बेपत्ता झाले. त्यांच्या शोधा नंतर खंडेश्वरी परिसरात एका विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आल्याची माहिती समोर आली. या घटनेने जोशी कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर पसरला आहे. त्यांच्या मोबाईल मधून त्यांच्या भावाला कुटुंबाचा सांभाळ कर असा संदेश पाठवला. तर शाळेतील शिक्षक तावरे यांना मी तुमच्या मनाप्रमाणे वागू शकलो नाही मला माफ करा असा संदेश पाठवला. या घटनेने बीड शहरांमध्ये खळबळ माजली असून आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही.

# एक क्विंटल ८६ किलो गांजा प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

## जिल्हा व सत्र न्यायाधीश माजलगाव यांचा आदेश

माजलगाव । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील हरिशचंद्र पिंपरी परिसरात गांजाची लागवड व साठवणूक केल्याच्या आरोपावरून दाखल करण्यात आलेल्या एनडीपीएस कायद्यांतर्गत प्रकरणात आरोपी संदीप विठ्ठलराव शिंदे यांस येथील जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी जामीन मंजूर केला आहे.या प्रकरणात पोलिसांनी केलेल्या कारवाई दरम्यान गांजाची एकूण १८६.५७ किलो वजनाची झाडे जप्त केल्याची नोंद प्रथम माहिती अहवालात आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की,दि.१८ ऑगस्ट २०२६ रोजी वडवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हरिशचंद्र पिंपरी येथील शेतात गांजासदृश वनस्पतींची लागवड केल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून छापा टाकण्यात आला. ◀◀ पान ३ वर

# ऊसाला पहिली उचल ४२५० रुपये, तर अंतिम दर ५००० रुपये द्या!

## मांजरा धरण ग्रीन बेल्टमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आज धनेगाव कॅम्प येथे बैठक

युसूफवडगांव । प्रतिनिधी

धनेगाव यंदाची दुष्काळी परिस्थिती, पाण्याचे दुर्भिक्ष आणि ऊस जगवण्यासाठी करावा लागणारा वाढता खर्च लक्षात घेता, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी यंदाच्या गळीत हंगामात ऊसाला विनाकपात पहिली उचल प्रतिटन ४२५० रुपये, तर अंतिम दर प्रतिटन ५००० रुपये देण्याची मागणी करण्यात येत आहे. या प्रमुख मागण्यांसह ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मांजरा धरण ग्रीन बेल्टमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता धनेगाव कॅम्प येथे आयोजित करण्यात आली आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जिल्ह्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, मका, बाजरी यांसह पावसावर अवलंबून असलेली खरीप पिके पाण्याअभावी होरपळून गेली आहेत. दुसरीकडे, मांजरा धरणाच्या ग्रीन बेल्टमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही पाणीटंचाईचा मोठा फटका बसत आहे. ऊस जगवण्यासाठी पाणी, वीज, मजुरी आणि इतर शेती निविष्ठांवर मोठा खर्च करावा लागत असून, त्या तुलनेत मिळणारा ऊसदर आणि उत्पादन खर्च यांचा ताळमेळ बसत नसल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

दुष्काळामुळे उसाचे वजनही मोठ्या प्रमाणात घटले असून, हातातोंडाशी आलेले पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी आर्थिक कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी साखर कारखान्यांनी योग्य दर जाहीर करणे गरजेचे असल्याची मागणी पुढे येत आहे.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटनांनी घेतलेल्या निर्णयानुसार, यंदाच्या ऊस गळीत हंगामात विनाकपात पहिली उचल प्रतिटन ४२५० रुपये आणि अंतिम दर प्रतिटन ५००० रुपये देण्याचे लेखी परिपत्रक साखर कारखाने सुरू होण्यापूर्वी जाहीर करावे, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच गतवर्षी जाहीर केलेल्या दराची पूर्ण पूर्तता करून थकीत रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. दुष्काळी परिस्थितीत उसाचे वजन निम्म्याने घटल्याने राज्य शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ◀◀ पान ३ वर

# आंतर-महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत आदित्य कृषी महाविद्यालयाला सुवर्णपदक

## आदित्य महाविद्यालयात स्पर्धा; मराठवाड्यातील १४ संघांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत आदित्य कृषी, जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्र व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर-महाविद्यालयीन बास्केटबॉल (मुले व मुली) स्पर्धेचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात ५ ऑक्टोबर रोजी पार पडल्या. प्रथमच ही स्पर्धा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या मुख्यालय



परिसराच्या बाहेर आयोजन करण्यात आली होती. एकाच दिवशी मुलांच्या व मुलींच्या दोन्ही गटांच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मराठवाड्यातील १४ संघ सहभागी झाले होते. आदित्य कृषी महाविद्यालयाच्या मलींच्या संघाने सुवर्णपदक पटकावले.

स्पर्धेच उद्घाटन विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. आदिती सारडा होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रात सक्रिय सहभाग घेऊन महाविद्यालयाचे तसेच विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. तसेच त्यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठचे परभणीचे ◀◀ पान ३ वर

# तीन एकरांत ५४ हजारांचा खर्च; हाती आले १० हजारांचे सोयाबीन!

## दासखेडमध्ये केंद्रीय पथकासमोर शेतकऱ्यांनी मांडली व्यथा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात केंद्रीय पथकाकडून पहाणी पेरणी, बियाणे, खते आणि महागड्या फवारण्यांवर हजारो रुपयांचा चुराडा करूनही पावसाच्या लहरीपणामुळे सोयाबीनचे पीक डोळ्यांदेखत जळून खाक झाले आहे. पाटोदा तालुक्यातील दासखेड येथे नुकत्याच आलेल्या केंद्रीय पाहणी पथकासमोर शेतकऱ्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून देत निसर्गाच्या या कोपाची भीषणता मांडली. तीन एकर शेतात तब्बल ५४ हजार रुपये खर्च करून केवळ ९ ते १० हजार रुपयांचेच उत्पन्न हाती येण्याची वेळ येथील शेतकऱ्यांवर आली आहे.

उत्पादन नगण्य, खर्च अव्वाच्या सव्वा!



दासखेड येथील शेतकरी सुधाकर नवनाथ ठोंबरे यांनी तीन एकर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र, पावसाने मारलेल्या प्रदीर्घ ओढीमुळे पिकाची वाढ खुंटली. या संपूर्ण तीन एकरांतून आता जेमतेम दीड ते दोन क्विंटल सोयाबीन मिळण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, बबनराव ठोंबरे या शेतकऱ्याची कहाणी तर अधिकच वेदनादायी आहे. त्यांच्या अडीच एकरांतील सोयाबीन पिकातून केवळ ६० ते ७० किलो उत्पादन हाती येईल, अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.

दुष्काळाच्या झळा: विहिरी कोरड्या, चाऱ्याची बिकट समस्या

कोरड्याठाक विहिरी: पावसाअभावी परिसरातील विहिरींचे पाणी पूर्णपणे आटले असून सिंचनासोबतच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भीषण बनला आहे.

जनावरांच्या ◀◀ पान ३ वर

# आ. सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांबाबत सोशल मीडियावरील आरोपांप्रकरणी कारवाईची मागणी

## समस्त आंबेडकरी संघटनांचे आष्टी पोलिसांना निवेदन; कारवाई न झाल्यास रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून कथित आक्षेपार्ह भाषा वापरून बिनबुडाचे आरोप केले जात असल्याचा आरोप करत, संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी संघटना, आष्टी तालुका यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पांढरे यांना निवेदन देण्यात आले असून, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनासह रास्ता रोको करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याविरोधात काही स्वयंघोषित समाजसेवकांकडून सोशल मीडियावर वारंवार आक्षेपार्ह भाषेत आरोप केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असून, त्यातून लोकप्रतिनिधी व त्यांच्या कुटुंबीयांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत



असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आमदार सुरेश धस हे आष्टी मतदारसंघातील कार्यक्षम आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी असून, सर्व जाती-धर्मांतील सर्वसामान्य जनतेशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यामुळे त्यांची ओळख महाराष्ट्रभर निर्माण झाली आहे. मात्र, काही व्यक्तींकडून सोशल मीडियाचा वापर करून त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या आरोपांमुळे मतदारसंघातील वातावरण दूषित होण्याची तसेच सामाजिक सलोखा आणि शांतता बिघडण्याची शक्यता असल्याची चिंता आंबेडकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावरून कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणे, आक्षेपार्ह भाषा वापरणे किंवा समाजात गैरसमज निर्माण होईल असे वर्तन करणे, याबाबत पोलिसांनी गांभीर्याने दखल घ्यावी. संबंधित प्रकरणाची योग्य चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

सोशल ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26